रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक १८०
www.ramprahar.com

◆ शुक्रवार, १६ जानेवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

पोलादपूरमध्ये खैराची वाहतूक पकडली; दोघे ताब्यात/२
अभ्यास स्पीडमध्ये करा, मात्र गाडी हळू चालवा/५
उरण प्रीमियर लीगचा दिघोडे संघ मानकरी/८

## अंडर-१९ वर्ल्डकपमध्ये भारताचा विजयारंभ, अमेरिका पराभूत



**बुलवायो (झिम्बाब्वे) :** १९ वर्षाखालील विश्वचषक स्पर्धेच्या पहिल्याच सामन्यात आयुष म्हात्रेच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने अमेरिकेवर सहा गडी राखून विजय मिळविला. बुलावायो येथील मैदानावर हेनिल पटेल याच्या भेदक माऱ्यामुळे अमेरिकेचा डाव १०७ धावांवर आटोपला. अमेरिकेने दिलेल्या धावांचा पाठलाग करताना पावसाच्या व्यत्ययामुळे भारताला ३७ षटकांत ९६ धावांचे लक्ष्य मिळाले होते. प्रत्युत्तरात वैभव सूर्यवंशी अवघ्या दोन धावांवर त्रिफळाचित झाला. कर्णधार आयुष १९ चेंडूत १९ धावा करून परतला. वेदांत त्रिवेदी २ (१०) आणि विहान मल्होत्राही १८(१७) फार काळ मैदानात टिकले नाहीत. अभिज्ञान कुंडू ४२ (४१) आणि कनिष्क चौहान १० (१४) यांनी संघाच्या विजय पक्का केला. पाच बळी टिपणाऱ्या पटेलला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले.

# महापालिका निवडणुकीसाठी मतदान झाले, आज निकाल



**पनवेल : येथील महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी सहकुटुंब मतदान केले.**

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील २९ महापालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी गुरुवारी (दि. १५) तुरळक प्रकार वगळता शांततेत मतदान झाले. सर्व ठिकाणची मतमोजणी लगेचच दुसऱ्या दिवशी म्हणजे शुक्रवारी (दि. १६) सकाळी १० वाजल्यापासून सुरू होणार असून दुपारपर्यंत निकाल अपेक्षित आहे.

सकाळी साडेसात वाजता मतदानाला सुरुवात झाली. अनेक मतदारांनी कामावर जाण्यापूर्वी सकाळच्या सत्रात मतदानास प्राधान्य दिले. ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग तसेच गर्भवती महिलांसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली होती. दुपारी मतदानाचा वेग काहीसा मंदावला, परंतु सायंकाळी पुन्हा वेग आल्याचे चित्र पहावयास आले. सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत मतदान प्रक्रियेची वेळ होती. त्यानंतरही रांगेत उभे असलेल्यांना नियमानुसार मतदानाची संधी देण्यात आली.

मतदानाच्या पार्श्वभूमीवर प्रशासकीय यंत्रणेने तयारी केली होती. त्याचप्रमाणे मतदान केंद्रांसभोवतालच्या परिसरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

## शाई पुसून पुन्हा मतदान शक्य नाही!

### मार्कर पेन वादावर निवडणूक आयोगाचे स्पष्टीकरण

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील २९ महापालिकांसाठी गुरुवारी (दि. १५) सर्वत्र मतदान सुरू असताना मतदानाच्या वेळी लावण्यात आलेल्या मार्कर पेनचा मुद्दा चर्चेत आला. ठाकरे बंधू आणि महाविकास आघाडीतील घटक पक्षांकडून मार्कर पेनद्वारे शाई लावण्याच्या गोष्टीचा कडाडून विरोध करण्यात आला, तर मार्कर पेनने शाई लावण्याचा निर्णय हा निवडणूक आयोगाचा असून आक्षेप असेल तर त्याबाबत कारवाई व्हावी, असे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. याचदरम्यान, राज्य निवडणूक आयोगाने या मुद्द्यावर परिपत्रक जारी केले करीत मार्कर पेनमुळे मतदार पुन्हा मतदान करू शकणार नाहीत, असा विश्वास व्यक्त केला.

बोटावर लावण्यात आलेली शाई पुसण्याचा प्रयत्न करून मतदारांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करणे हे गैरकृत्य आहे. त्याचबरोबर बोटावरची शाई पुसून एखादी व्यक्ती पुन्हा मतदान करण्यासाठी आल्याचे आढळल्यास त्यावर योग्य ती कायदेशीर कार्यवाही केली जाईल, असे स्पष्टीकरण राज्य निवडणूक आयोगाने दिले. बोटावरची शाई पुसून कोणी गैरकृत्य करण्याचा प्रयत्न केला तरी संबंधित मतदाराला पुन्हा मतदान करता येत नाही. याबाबतची दक्षता यापूर्वीच घेण्यात आली आहे. मतदाराने मतदान केल्यानंतर त्याची नोंद घेण्यात आलेली असते. त्यामुळे केवळ शाई पुसून गैरकृत्य केलेल्या मतदाराला पुन्हा मतदान करता येत नाही. याबाबत सतर्कता बाळगण्याच्या सूचना पुन्हा एकदा सर्व संबंधिताना देण्यात आल्या आहेत, असे आयोगाने म्हटले आहे.

मतदाराच्या बोटाला शाई लावण्याकरिता मार्कर पेनच्या वापराबाबत राज्य निवडणूक आयोगाने १९ आणि २८ नोव्हेंबर २०११ रोजी आदेश निर्गमित केले आहेत. तेव्हापासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदाराच्या बोटाला शाई लावण्यासाठी मार्कर पेनचा वापर केला जात आहे. या आदेशानुसार मतदाराच्या बोटावर ठळकपणे उमटेल, अशा पद्धतीने मार्कर पेनने शाई लावण्यात यावी तसेच नखावर आणि नखाच्या वरच्या बाजूला त्वचेवर तीन-चार वेळा घासून शाई लावावी, अशा सूचना यापूर्वीदेखील देण्यात आल्या असून आणि त्या मार्कर पेनवरही नमूद केल्या आहेत. त्यामुळे शाई पुसण्याचा प्रयत्न करण्याचे गैरकृत्य करू नये, असे आवाहन राज्य निवडणूक आयोगाने केले आहे.




> *सोशल मीडियावरून आमच्याकडे जे व्हिडीओ आले आहेत ते खरे असतील, तर त्याची आम्ही चौकशी करू, मात्र चुकीच्या पद्धतीने व्हिडीओ रेकॉर्ड करून मतदारांमध्ये संभ्रम निर्माण करत असतील, तर संबंधितांवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. मतदारांनीही शाई पुसू नये. ती सुकायला थोडा वेळ लागतो. त्याच्याआधीच जर शाई पुसली, तर ती मतदारांची चूक असून त्यांच्याविरोधातही गुन्हा दाखल होऊ शकतो.*
>
> **-दिनेश वाघमारे,** *राज्य निवडणूक आयुक्त*

### जि.प. निवडणुकीत शाईच वापरणार

२०११च्या निवडणूक आयोगाने निर्गमित केलेल्या आदेशापासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदाराच्या बोटाला शाई लावण्यासाठी मार्कर पेनचा वापर केला जात आहे. यामुळे यंदा गोंधळ निर्माण झाला. म्हणून निवडणूक आयोगाने कोणताही वाद उद्भवू नये म्हणून पुढच्या निवडणुकीत मार्कर पेनऐवजी पारंपरिक शाईच वापरणार असल्याचे सांगितले आहे.

## एक्झिट पोलमध्ये महायुतीच्या विजयाचा अंदाज

**मुंबई :** राज्यातील मुंबईसह २९ महापालिकांच्या निवडणुकीचा निकाल शुक्रवारी (दि. १६) जाहीर होणार आहे, पण त्याआधीच एक्झिट पोल्सचे अंदाज समोर आले असून मुंबईत ठाकरे बंधूंना झटका बसणार आहे. मुंबई महापालिकेत २२७ जागांपैकी सर्वाधिक जागा भाजप सर्वाधिक जिंकून महायुती बहुमत मिळवेल असा अंदाज आहे.

मुंबईत ॲक्सिस माय इंडियाच्या एक्झिट पोलनुसार भाजप-शिवसेना युतीला १३१ ते १५१ जागा, ठाकरे बंधूंच्या युतीला ५८ ते ६८ आणि काँग्रेसला १२ ते १६ जागा मिळतील. याशिवाय अपक्ष आणि इतरांच्या ६ ते १२ जागा जिंकून येण्याची शक्यता आहे. डीव्ही रिसर्चच्या एक्झिट पोलनुसार महायुतीतील भाजप-शिंदे



शिवसेनेला १०७ ते १२२ जागा मिळतील, तर ठाकरे बंधूंच्या युतीला ६८ ते ८३ जागा मिळू शकतात. जनमतचा एक्झिट पोलनुसार भाजप आणि शिंदे यांच्या युतीला १३८ जागा, ठाकरे बंधू आणि पवारांच्या राष्ट्रवादीला ६२ जागा मिळतील. दुसरीकडे, काँग्रेस आणि वंचित आघाडीला २० जागा, तर इतर पक्षांना सात जागा मिळण्याची शक्यता आहे.

पॉलिटिकल ब्युरो ॲण्ड ॲनालिसिस ब्युरो म्हणजेच प्राब संस्थेने पुणे महापालिकेत भाजपला स्पष्ट बहुमत मिळणार असल्याचा दावा केला आहे. प्राबच्या सर्वेक्षण आकडेवारीनुसार पुण्यात भाजपला ९१ जागांवर विजय मिळेल. राष्ट्रवादीला ४३, ठाकरेंच्या शिवसेनेला सात आणि काँग्रेसला आठ जागा मिळण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यामुळे पुण्यात अजित पवारांच्या राष्ट्रवादीला हा दे धक्काच म्हणता येईल.

पिंपरी चिंचवड महापालिकेतही भाजपची सत्ता येण्याचा अंदाज मांडण्यात आला आहे. अजित पवार आणि शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस दुसऱ्या क्रमांकावर असेल. शिंदेसेनेला पाच, तर उद्धवसेनेला दोन जागा मिळतील असा कौल या एक्झिट पोलने दिला आहे.

### सेलिब्रिटींनीही बजावला मुंबईत मतदानाचा हक्क

**मुंबई :** मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत सामान्य व्यक्तींसह सेलिब्रिटींनीही मतदानाचा हक्क बजावला. सर्वात आधी मतदान करणाऱ्यांमध्ये ट्विंकल खन्ना, अक्षय कुमार आणि सान्या मल्होत्रा या अभिनेत्यांचा समावेश होता.



ज्येष्ठ अभिनेत्री हेमा मालिनीने मतदानाचा हक्क बजावला. त्यांनी मुंबईकरांना मतदान करण्याचे आवाहन केले. आमिर खानच्या कुटुंबाने मतदानाचा हक्क बजावला. क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरने पत्नी, मुलीसह मतदान केले. याशिवाय इतर सिनेकलाकार आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी मतदान करून लोकशाहीप्रती आपली जबाबदारी बजावली.

## निवडक

### देशभरात ७८वा सेना दिवस उत्साहात साजरा

**नवी दिल्ली :** देशभरात ७८वा सेना दिवस गुरुवारी (दि. १५) साजरा झाला. सेना दिनानिमित्त शूर जवान आणि त्यांच्या कुटुंबियांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी शुभेच्छा दिल्या. देशाचे सैनिक हे निस्वार्थ सेवा आणि दृढ वचनबद्धतेचे प्रतीक आहेत, असे गौरवोद्गार पंतप्रधान मोदींनी काढले. ते निस्वार्थ भावनेचे प्रतीक असून त्यांच्यामुळे देशवासियांमध्ये आत्मविश्वासाची भावना निर्माण होते, असेही त्यांनी म्हटले.

### ईडीविरोधात एफआयआरला सुप्रीम कोर्टाची स्थगिती

**नवी दिल्ली :** पश्चिम बंगालच्या पोलिसांनी सक्तवसुली संचालनालय (ईडी) अधिकाऱ्यांविरोधात दाखल केलेल्या एफआयआरला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेससाठी काम करणाऱ्या आयपॅक संस्थेच्या कार्यालयावर ईडीने छापा टाकला होता. त्या विरोधात बंगाल पोलिसांनी ईडीच्या अधिकाऱ्यांवर एफआयआर दाखल केली होती.

## सामाजिक हितासाठी सरकार कटिबद्ध -पंतप्रधान मोदी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताने आपल्या विविधतेतून लोकशाही बळकट केली. समाजातील सर्वांत शेवटच्या घटकापर्यंत पोहचणे हाच भारतीय लोकशाहीचा अर्थ आहे आणि कोणताही भेदभाव न करता सामाजिक हित साधण्यासाठी सरकार काम करत आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. नवी दिल्लीत राष्ट्रकुल संघटनेतील देशांचे पीठासीन अधिकारी आणि अध्यक्षांच्या परिषदेला ते संबोधित करीत होते.

या परिषदेचे महत्त्व अधोरेखित करताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, लोकशाही संस्था आणि लोकशाही प्रक्रियांमुळे लोकशाही राज्यपद्धतीला स्थैर्य आणि वेग मिळतो. गेल्या काही वर्षांत देशातील जवळपास २५ कोटी नागरिकांना दारिद्र्यातून बाहेर काढले असून ग्लोबल साऊथचे मुद्दे प्रत्येक जागतिक मंचावर भारत जोरकसपणे मांडत आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि समाजमाध्यमांनी (सोशल मीडिया) लोकशाही संस्थांची कार्यक्षमता वाढवली आहे, असे मत लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी या वेळी मांडले, मात्र या नव्या तंत्रज्ञानाच्या गैरवापरामुळे चुकीची माहिती, सायबर गुन्हेगारी आणि भेदभावही वाढत असल्याचे ते म्हणाले. या आव्हानांचा सामना करण्यासाठी योग्य ती पावले उचलण्याची गरज बिर्ला यांनी व्यक्त केली.

या परिषदेत महत्त्वाच्या जागतिक प्रश्नांवर चर्चा होईल आणि ठोस धोरणात्मक निर्णय घेतले जातील, अशी अपेक्षा लोकसभेच्या सभापतींनी यांनी व्यक्त केली. भारतीय संसदेची गेल्या सात दशकांची वाटचालही त्यांनी विशद केली.

संवाद, चर्चा आणि मतभेदाच्या प्राचीन भारतीय परंपरेतून देशाच्या संसदीय प्रणालीला बळ मिळाले आहे, असे राज्यसभेचे उपाध्यक्ष हरीवंश यांनी म्हटले.

## कुठलीही दहशत खपवून घेणार नाही : मुख्यमंत्री

**नागपूर : प्रतिनिधी**

मुंबई असो वा नागपूर, कुठलीही दहशत खपवून घेतली जाणार नाही. दहशत माजवण्याचा कुणाचाही प्रयत्न चालू देणार नाही, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईतील भगवा गार्ड संकल्पना तसेच नागपुरातील भाजप उमेदवारावरील हल्ल्याचा तीव्र निषेध केला. नागपुरात महापालिका निवडणुकीसाठी मतदान केल्यानंतर ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

निवडणूक आयोगाची यंत्रणा बोगस, दुबार मतदार हुडकून काढण्यासाठी कार्यरत आहे.



ते त्या पद्धतीने काम करीत आहेत त्यासाठी वेगळी यंत्रणा उभारण्याची गरज नाही. मुळात काही निवडक केंद्राबाहेरच ही यंत्रणा का आहे. मुंबईत सिलेक्टिव्ह काम सुरू आहे का, असा सवालदेखील त्यांनी उपस्थित केला. मुळात मुंबईत यंत्रणा उभारण्याची क्षमताच त्यांच्यात राहिलेली नाही, असा टोलादेखील त्यांनी राज आणि उद्धव यांच्या नेतृत्वाखालील ठाकरे सेनेला लगावला. मुंबईतील जनता आता महायुतीच्या बाजूने कौल देणार आहे, असा दावाही त्यांनी केला.

दरम्यान, नागपूर मनपा निवडणुकीत भाजपचे उमेदवार भूषण शिंगणे यांच्यावर बुधवारी मध्यरात्री करण्यात आलेल्या तीव्र निषेध मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. दोषींवर कितीही मोठा बदमाश असला तरी कारवाई होणारच, असेही मुख्यमंत्र्यांनी या वेळी स्पष्ट केले.



**पनवेल : गव्हाण कोळीवाडा येथील आई एकवीरेची मानाची पालखी कार्ला येथे गेली होती, ती बुधवारी परतली. यानंतर गुरुवारी भंडारा झाला. या सोहळ्यास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, वाय.टी. देशमुख यांनी भेट देत दर्शन घेतले. त्यांचे स्वागत व सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमास न्हावे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, वहाळचे माजी उपसरपंच अमर म्हात्रे, गव्हाणचे माजी उपसरपंच सचिन घरत यांच्यासह नामदेव ठाकूर, अस्मिता भगत, अनुप भगत, पालखीचे अध्यक्ष प्रवीण कोळी तसेच सर्व सदस्य उपस्थित होते.**

## खोपोलीच्या उपनगराध्यक्षपदी भाजपचे विक्रम साबळे

### तीन स्वीकृत नगरसेवकांचीही बिनविरोध निवड



**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगर परिषदेच्या उपनगराध्यक्ष आणि स्वीकृत नगरसेवकपदाची निवडणूक गुरुवारी (दि. १५) झाली. निवडून आलेल्या बलाबलानुसार शिवसेना, भाजप व राष्ट्रवादी प्रत्येकी एक अशा तीन स्वीकृत नगरसेवकांची बिनाविरोध निवड झाली. त्याचप्रमाणे भाजपचे विक्रम साबळे उपनगराध्यक्ष म्हणून बिनाविरोध विजयी झाले आहेत.

खोपोली नगर परिषदेत थेट नगराध्यक्षपदी महायुतीचे कुलदीपक शेंडे (शिवसेना) निवडून आले होते, तर ३१ नगरसेवकपदाच्या उमेदवारांपैकी १४ शिवसेनेचे, सात राष्ट्रवादीचे, भाजप व शेकापचे प्रत्येकी चार तसेच राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष व अपक्ष प्रत्येकी एक असे निवडून आले. भाजप, शिवसेना व रिपाइं महायुती मिळून स्पष्ट बहुमत मिळाले असल्याने निवडणुकीआधी ठरल्याप्रमाणे उपनगराध्यक्षपद भाजपला देण्यात आले. त्यानुसार भाजपचे सर्वात तरुण नगरसेवक विक्रम यशवंत साबळे यांची या पदावर बिनाविरोध निवड झाली.

महायुतीला दोन स्वीकृत नगरसेवक मिळणार होते. त्यानुसार शिवसेनेकडून खोपोली उपशहरप्रमुख दिनेश थोरवे यांचा एकमेव अर्ज दाखल झाला. गेली अनेक वर्षे राजकीय व सामाजिक कामाच्या जोरावर व प्रामाणिकतेमुळे थोरवे यांना हा बहुमान मिळाल्याचे बोलले जात आहे. भाजपकडून खोपोली शहर महिला मोर्चा अध्यक्ष असणाऱ्या निष्ठावंत अश्विनी अत्रे यांची बिनविरोध निवड झाली. (पान २ वर..)

## पालिकांनंतर आता झेडपी निवडणुकीचा धुरळा

### आजपासून अर्ज स्वीकृती; घडामोडींना वेग

**अलिबाग : प्रतिनिधी**

नगर परिषदा-नगरपंचायती, महानगरपालिका निवडणुकीनंतर राज्यात आता स्थानिक स्वराज्य संस्थांमधील जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांची निवडणूक होत आहे. यासाठी शुक्रवार (दि.१६) पासून अर्ज भरायला सुरुवात होणार आहे. २१ जानेवारीपर्यंत ऑफलाईन पद्धतीने यासाठी अर्ज भरता येतील.

रायगड जिल्हा परिषदेच्या ५९ गटांसाठी आणि १५ पंचायत समित्यांच्या ११८ गणांसाठीही ५ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे. निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्याने राजकीय घडामोडींना वेग आला आहे.

याआधी २०१७मध्ये जिल्हा परिषदेची सार्वत्रिक निवडणूक झाली होती. २० मार्च २०२२



रोजी सर्व जिल्हा परिषदा बरखास्त झाल्या. तेव्हापासून विविध कारणांमुळे या निवडणुका तीन वर्षे लांबत गेल्या. जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांवर प्रशासकीय राजवट राहिली.

२०२२मध्ये रायगड जिल्हा प्रशासनाने प्रभाग रचनेचा प्रारूप आराखडा तयार करून तो राज्य शासनाकडे पाठवला होता. त्या वेळी २०२१ची संभाव्य जनगणना लक्षात घेऊन प्रभाग रचना करण्यात आली. नवीन प्रभाग रचनेनुसार जिल्हा परिषदेच्या मतदारसंघासाठी संख्या ६६, तर पंचायत समितीच्या प्रभागांची संख्या १३२ होणार होती. म्हणजेच जिल्हा परिषदेचे प्रभाग संख्या सातने, तर पंचायत समितीच्या प्रभागांची संख्या १४ने वाढणार होती, मात्र कोविड काळामुळे २०२१ची जनगणना झालीच नाही. त्यामुळे या प्रभाग रचनांवर आक्षेप घेण्यात आले होते. म्हणून पुन्हा एकदा २०११ची जनगणना ग्राह्य धरून प्रभाग रचना करण्याचा निर्णय घेण्यात आला. परिणामी २०१७मध्ये झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीप्रमाणे जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांचे प्रभाग कायम राहिले आहे. (पान २ वर..)

### रायगडातील आकडेवारी

| तालुका | जि.प. गट | पं. स. गण | मतदार | मतदान केंद्र |
|---|---|---|---|---|
| पनवेल | ८ | १६ | २,७९,७७६ | ३४६ |
| अलिबाग | ७ | १४ | २,०१,९२३ | २६१ |
| कर्जत | ६ | १२ | १,७०,७०२ | २२० |
| पेण | ५ | १० | १,३९४७९ | १९० |
| महाड | ५ | १० | १३९,४४६ | २०३ |
| खालापूर | ४ | ८ | १,१०,९८२ | १४४ |
| उरण | ४ | ८ | १,०८,५२० | १३५ |
| रोहा | ४ | ८ | १,२८,७६३ | १९४ |
| माणगाव | ४ | ८ | १,३९,५१९ | २०६ |
| मुरूड | २ | ४ | ५५,५५२ | ८१ |
| सुधागड | २ | ४ | ५३,९९८ | ७५ |
| तळा | २ | ४ | ३२,१२२ | ५२ |
| म्हसळा | २ | ४ | ४३,५३१ | ६९ |
| श्रीवर्धन | २ | ४ | ५६,८२६ | ८० |
| पोलादपूर | २ | ४ | ३९,२४२ | ६७ |
| एकूण | ५९ | ११८ | १७,००,३८१ | २,३२३ |

# रायगडात सिकलसेल ॲनिमिया अभियानास प्रारंभ

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबागमधील जिल्हा रुग्णालय येथे गुरुवारी (दि. १५ )अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियानाचा शुभारंभ करण्यात आला.तपासणी शिबिराच्या पहिल्या दिवशी अलिबाग जिल्हा रुग्णालयात २१ जणांची तपासणी करण्यात आली असून सर्वांची तपासणी निगेटिव्ह आली आहे.

या वेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. शीतल जोशी, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. किरण शिंदे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी, प्रशासकीय अधिकारी डॉ. प्रवीण कांदडे, अस्थिव्यंग तज्ज्ञ डॉ. आशिष मिश्रा, अधिसेविका गायत्री म्हात्रे, सहा. अधिसेविका अनिता भोपी आदी मान्यवर उपस्थित होते.




जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्र, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय व तालुका आरोग्य कार्यालयात या तपासणी शिबिराचा शुभारंभ करण्यात आला आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निशिकांत पाटील यांच्या नेतृत्वाखाली १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारीदरम्यान सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियान राबविण्यात येत आहे. अभियानादरम्यान ० ते ४० वर्षावरील नागरिकांची प्राथमिक तपासणी करण्यात येणार आहे.

रायगड जि.प. आरोग्य विभागामार्फत एकूण ५५ प्राथमिक आरोग्य केंद्रे, त्यांच्या अंतर्गत २८० प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे, ६ उपजिल्हा रुग्णालय, ८ ग्रामीण रुग्णालयात व १५ तालुका आरोग्य कार्यालयात ही तपासणी करण्यात येणार आहे. या अभियानासाठी जिल्हयामध्ये आरोग्य विभागाच्या २९७ पथके सिकलसेल सर्वेक्षण करणार आहेत.

**सिकलसेलमुक्त रायगड जिल्हा करण्यासाठी सर्व नागरिकांनी या मोहिमेत उत्स्फूर्त सहभाग घ्यावा. विशेषतः तरुणांनी तपासणी करून घेऊन प्रशासनास सहकार्य करावे व रायगड जिल्हा सिकलसेल ॲनिमियामुक्त करावा.**
**-नेहा भोसले,**
मुख्य कार्यकारी अधिकारी, राजिप

# पोलादपूरमध्ये खैराची वाहतूक पकडली; दोन जण ताब्यात

## वनविभागाची कारवाई, सात लाखांचा मुद्देमाल जप्त

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर शहराजवळ वनविभागाच्या पथकाने सापळा रचून गुजरात राज्यातून चिपळूणकडे होणारी अवैध खैराची तस्करी रोखली आहे. या धडक कारवाईमध्ये अवैध खैर लाकडाचा साठा असलेला ट्रक आणि त्या ट्रकला मोटारसायकलने रस्ता दाखवणारा दुचाकीस्वार अशा दोघांना सात लाखांहून अधिक किंमतीच्या मुद्देमालासह पकडण्यात वनविभागाच्या महाड पथकाला यश आले आहे.



मुंबई-गोवा महामार्गावरून मंगळवार, दि. १३ जानेवारी रोजी सायंकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास एक ट्रक (एमएच १२ इक्यू ९८६६) हा संशयास्पदरित्या जात असल्याचे पोलादपूर वनउपज तपासणी नाक्यावरील वनविभागाच्या कर्मचाऱ्यांच्या लक्षात आले. या ट्रकच्या पुढे त्याला रस्ता दाखवण्यासाठी यामाहा ही मोटारसायकल पथदर्शक म्हणून चालत असल्याचे तपासात आढळून आले. यावेळी वनविभागाने तात्काळ हालचाली करीत केलेल्या कारवाईत मोहम्मद अर्शद (रा.गुलशन नगर, दाहेली, जि.बलसाड, गुजरात) आणि मोहम्मद उस्मान मुबीन खान (रा.रा. जनाबजी चाळ, खिंडीपाडा, मुलुंड कॉलनी, मुंबई) या दोघांना ताब्यात घेतले. जप्त वाहनांची मुद्देमालासह अंदाजे किंमत ७ लाख १ हजार ६६ रूपये आहे.

अवैध खैर वाहतुक केल्याप्रकरणी न्यायालयाने आरोपींना ३ दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.

# जि.प., पं.स. निवडणूक प्रचार वाहनांवरील झेंडे, फलकांवर निर्बंध

**अलिबाग : प्रतिनिधी**

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक-२०२६ ची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय्य वातावरणात पार पडावी, यासाठी निवडणूक प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांवरील पक्ष प्रचाराचे झेंडे व कापडी फलक याबाबत जिल्हादंडाधिकारी किशन जावळे यांनी निर्बंधात्मक आदेश जारी केले आहेत.

मा.भारत निवडणूक आयोगाने दि.१३ जानेवारी २०२६ रोजीच्या प्रसिध्दी पत्रकान्वये जिल्ह्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक-२०२६ चा कार्यक्रम जाहीर केला आहे. रायगड जिल्ह्यात गुरुवार, दि.५ फेब्रुवारीला मतदान तर शनिवार, दि.७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी होणार आहे. या कालावधीत आदर्श आचारसंहिता लागू असून तिची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये हा आदेश देण्यात आला आहे.

आदेशानुसार, प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या फिरत्या वाहनांवर पक्ष प्रचाराचा झेंडा वाहनाच्या डाव्या बाजूस विंडस्क्रीन ग्लासच्या पुढे राहणार नाही आणि तो वाहनाच्या छतापासून २ फुटांपेक्षा जास्त राहणार नाही. प्रचाराच्या फिरत्या वाहनांवर कापडी फलक हे वाहन चालकाच्या आसनामागे वाहनाच्या डाव्या व उजव्या बाजूने लावण्यात यावा. इतर कोणत्याही बाजूस तो लावता येणार नाही.

फिरत्या वाहनांवर लावयचा पक्ष प्रचाराचा झेंडा किंवा कापडी फलकसंबंधित पक्षाचे जिल्हाध्यक्ष उमेदवार व उमेदवाराचे निवडणूक प्रतिनिधी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून अधिकृत परवानगी घेतलेल्या वाहना व्यतिरिक्त इतर कोणत्याही वाहनांवर लावता येणार नाही.

हे आदेश आचारसंहितेच्या कालावधीत, निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत लागू राहणार आहेत. हा आदेश प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचविणे शक्य नसल्याने पोलीस विभागामार्फत ध्वनीक्षेपकावर जाहीर करून त्याची व्यापक प्रसिद्धी देण्याचेही आदेश जिल्हादंडाधिकाऱ्यांनी दिले आहेत.

## निवडणुकीचे बिगूल वाजताच कागदपत्रे गोळा करण्यासाठी उमेदवारांची धावपळ

**तळा : प्रतिनिधी**

नुकतेच जिल्हापरिषद व पंचायत समिती निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला असून ५ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. त्या दृष्टीने तळा तालुक्यात चार पंचायत समिती व दोन जिल्हा परिषद गणांतील अनेक कार्यकर्ते आपल्याला उमेदवारी मिळावी यासाठी गुडघ्याला बाशिंग बांधून तयार असून अनेकजण उमेदवारी मिळावी यासाठी रस्सीखेच चालू आहे.कोणत्याही गणातून उमेदवारी मिलेल त्या गणातून उमेदवारी मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू झाले आहेत.तालुक्यात राष्ट्रवादी (अजितपवारगट),भाजपा, शिवसेना(शिंदेगट) शिवसेना (ठाकरे गट), राष्ट्रवादी (शरद पवार गट),शेकाप पक्ष,कॉंग्रेस व इतर पक्ष आहेत. आताच्या जिल्हा परिषद व पंचायत समिती गट व गण खालील प्रमाणे ८५ बोरघरहवेली ,८६ चरई खुर्द ,८७ रहाटाड ,८८ मांदाड व जि.प.गट ४३ चरईखुर्द व ४४ रहाटाड असे आहेत

आता निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून अनेक इच्छूकांची संख्या वाढत असल्याचे पहावयास मिळत आहे.सर्वच पक्षांचे कार्यकर्ते कामाला लागले असून कोणाची युती कशी होतेय तीही महत्वाची ठरणार आहे.

## शिरवणे आरोग्य केंद्रात मतदान सुरू असताना आढळला कोब्रा

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ सेक्टर १ येथील शिरवणे आरोग्य केंद्रात मतदानाची व्यवस्था पालिकेने केली होती. या ठिकाणी मतदान सुरू असताना कोब्रा नाग आढळला त्यामुळे एकच गोंधळ उडाला, बंदोबस्तावर असणाऱ्या पोलिसांनी प्रसंगावधान राखत त्या नागाला पकडले. सर्पमित्राला बोलावून त्या नागाला सुखरूप निसर्गाच्या स्वाधीन करण्यात आले.



या आरोग्य केंद्राच्या आवारात मतदारांसाठी मंडप उभारण्यात आले आहेत. या आरोग्य केंद्राच्या अवतीभवती दाट झाडी असून, या आरोग्य केंद्रात याआधी देखील साप आढळले आहेत. त्यांची सुटका सर्पमित्रांनी केली आहे. मात्र कोब्रा सारखा अतीविषारी नाग आढळल्याने नागरिकांनी सतर्क राहावे असे आवाहन करण्यात येत आहे.

इथल्या कर्मचाऱ्यांच्या सांगण्यावरून येथे कोब्रा नाग याआधी देखील पाहायला मिळाला होता. या आरोग्य केंद्रात नेहमी रुग्णांची देखील गर्दी असते. मात्र मतदानाला असणाऱ्या गर्दीच्या वेळी हे नाग आढळल्याने चिंता व्यक्त केली जात आहे.

# सुधागडमध्ये आरक्षणाच्या गणितामुळे नेते अडचणीत; उमेदवारी जाहीर करण्यास पक्षांना विलंब

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गेल्या काही दिवसांपासून विविध तर्कवितर्कांना उधाण आले होते. मात्र नुकतेच निवडणूक आयोगाने या निवडणूका जाहीर करून आचारसंहिता लागू केल्याने या चर्चांना आता पूर्णविराम मिळाला आहे. मात्र निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्यानंतरही उमेदवारी जाहीर करण्यात सर्वच पक्षांकडून विलंब होत असल्याचे चित्र सध्या सुधागड तालुक्यात दिसून येत आहे.

या निवडणुकीत लागू झालेल्या आरक्षणाच्या नव्या आराखड्यामुळे अनेक अनुभवी नेते व विद्यमान पदाधिकारी अडचणीत सापडले आहेत. काहींना आपला पारंपरिक मतदारसंघ सोडून दुसऱ्या ठिकाणी प्रयत्न करावा लागत आहे, तर काहींची उमेदवारीच धोक्यात आली आहे. विशेषतः महिला, अनुसूचित जाती-जमाती व इतर मागासवर्गीय प्रवर्गासाठी लागू झालेल्या आरक्षणामुळे अनेक ठिकाणी पक्षांतर्गत नाराजी व दबाव गटांचे राजकारण उफाळून आले आहे.

**बदललेल्या आरक्षणाचा फटका**

दरम्यान, अनेक नेते व कार्यकर्ते गेल्या अनेक वर्षांपासून आपल्या मतदारसंघात सातत्याने काम करत असून, आता आरक्षण बदलल्या मुळे त्यांना निवडणुकीपासून वंचित राहावे लागणार असल्याची खंत व्यक्त होत आहे. त्यामुळे या निवडणुकीत नव्या चेहऱ्यांना संधी मिळण्याची शक्यता असून, स्थानिक राजकारणात नव्या समीकरणांची नांदी होण्याची चिन्हे आहेत.

सुधागड तालुक्यातही याचे पडसाद उमटत असून, काही पक्षांमध्ये वरिष्ठ नेत्यांच्या निकटवर्तीयांना संधी मिळणार असल्याची चर्चा आहे. त्यामुळे पारंपरिक कार्यकर्ते व स्थानिक नेतृत्व यांच्यात अस्वस्थता निर्माण झाली आहे. यामुळे उमेदवार निवड प्रक्रियेत मोठे बदल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

राजकीय समीकरणेही या निवडणुकीत बदलत असल्याचे स्पष्ट होत आहे. कोणता पक्ष कोणाशी युती करणार, कोण कोणाच्या गटातून निवडणुकीत उतरणार, कोणाला संधी मिळणार आणि कोणाला माघार घ्यावी लागणार-हे सर्व चित्र येत्या दोन दिवसांत स्पष्ट होईल, अशी अपेक्षा आहे.

पान १ वरुन



## खोपोलीच्या उपनगराध्यक्षपदी भाजपचे विक्रम साबळे

या निवडणुकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे सुनील पाटील थेट नगराध्यक्षपदी पराभूत झाले होते. त्यांना पक्षाने स्वीकृती नगरसेवकपदाची उमेदवारी देत प्रवाहात ठेवण्याचे काम केले आहे. त्यांचाही एकमेव अर्ज असल्यामुळे ते बिनविरोध निवडून आले आहेत.

नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली कौन्सिल हॉलमध्ये हा निवड कार्यक्रम झाला. या वेळी मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील व प्रशासनातील अधिकारी उपस्थित होते.

निवडीनंतर महायुतीतर्फे ढोल ताशाच्या गजरात, फटाक्यांची आतषबाजी करीत मिरवणूक काढत आनंद व्यक्त करण्यात आला. या मिरवणुकीत भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, कर्जत तालुका अध्यक्ष राजेश भगत, खोपोली शहर अध्यक्ष अजय इंगुलकर, विक्रम साबळे यांचे वडील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते यशवंत साबळे यांच्यासह भाजप, शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

दरम्यान, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेंद्र थोरवे यांनी दूरध्वनीवरून उपनगराध्यक्ष विक्रम साबळे आणि महायुतीच्या नवनिर्वाचित स्वीकृत नगरसेवकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## पालिकांनंतर आता झेडपी निवडणुकीचा धुरळा

पनवेल तालुक्यात जिल्हा परिषदेचे सर्वाधिक आठ मतदारसंघ आहेत. अलिबाग तालुक्यात सात, कर्जत सहा, पेण व महाड प्रत्येकी पाच, खालापूर, रोहा, उरण व माणगाव प्रत्येकी चार, सुधागड, मुरूड, तळा, म्हसळा, पोलदपूर व श्रीवर्धनमध्ये प्रत्येकी दोन अशी मतदारासंघ विभागणी आहे.

**असे आहे जि. प. आरक्षण**

सर्वसाधारण : पाभरे, पांगळोली, नडगाव तर्फे बिरवाडी, करंजाडी, लोहारे, निजामपूर, मोर्बा, वासांबे, सावरोली, दादर, वडखळ, शहापूर, आवास, चौल, राजपुरी, नागोठणे, भुवनेश्वर; सर्वसाधारण महिला : आराठी, चरई खुर्द, तळाशेत, पळस्पे, वडघर, गव्हाण, माणगाव तर्फे वरेडी, नेरळ, आतकरवाडी, जांभूळपाडा, शिहू, नवघर, चाणजे, आंबेपूर, थळ, कोर्लई; नागरिकांचा मागास प्रवर्ग : दासगाव, कापडे बुद्रुक, केळवणे, कडाव, जासई, चिरनेर, काविर; नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) : बिरवाडी, खरवली, रहाटाड, वावंजे, वावेघर, चेंढरे, आंबेवाडी, घोसाळे; अनुसूचित जमाती : नेरे, कळंब, राबगाव, महलमिऱ्या डोंगर; अनुसूचित जमाती महिला : बोर्लीपंचतन, कशेळे, मोठे वेणगाव, चौक, जिते; अनुसूचित जाती : गोरेगाव, अनुसूचित जाती (महिला) : पाली देवद.

## मतदान केंद्रावर बटणाचा गोंधळ : मत टाकण्यासाठी मतदाराने मारली पॅनलवर थाप

**नवी मुंबई : बातमीदार**

मतदानाचा एक साधा आणि सुरळीत अनुभव असायला हवा होता. मात्र कोपरखैरणे येथील वाय. बी. चव्हाण सीबीएसई शाळेत मतदान करताना कार्यकर्ते बी.एन. कुमार यांना एक विचित्र आणि काहीसा विनोदी प्रसंग अनुभवावा लागला.



मी मतदान यंत्रावर तबला वाजवला, असे कुमार यांनी सांगितले. गुलाबी पॅनलवरील बटणच काम करत नव्हते. कुमार यांच्या मते, मतदान अधिकाऱ्याने सुरुवातीला चौथे बटण बिघडले असल्याचे सांगितले. ते बूथमधून बाहेर पडणार इतक्यातच पीठासीन अधिकारी धावून आले आणि कोणते बटण दाबायचे आहे, असे विचारले. ते खूपच विचित्र वाटले, कुमार म्हणाले. मी जोरात दाबले, अक्षरशः पॅनलवर थाप मारली, तेव्हा कुठे चौथे मत नोंदवले गेले.

कुमार यांच्या म्हणण्यानुसार, अधिकाऱ्यांनी ही अडचण अगदी सहजपणे मान्य केली. सकाळपासून लोक मशीन दाबत आहेत, ठोसे मारत आहेत, असे एका अधिकाऱ्याने हसत सांगितल्याचा दावा कुमार यांनी केला.

सकाळच्या सत्रात मतदान सुरळीत झाले असून मतदार पटकन मतदान करून बाहेर पडत होते, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. मात्र संध्याकाळच्या वेळेस गर्दी वाढली. काही मतदान केंद्रांवर सायंकाळी ४.३० वाजेपर्यंत सुमारे ६० टक्के मतदान झाले होते, त्यामुळे आधीच अडचणीत असलेल्या यंत्रांवर ताण वाढला.

# नाईक महाविद्यालयात मकरसंक्रांतीनिमित्त पतंग आणि हलव्याचे दागिने निर्मिती उपक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

एफ. जी. नाईक कला , सायन्स आयटी. आणि वाणिज्य महाविद्यालय येथे मकरसंक्रांतीचे औचित्य साधून विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती व परंपरेची जाणीव निर्माण करण्यासाठी तसेच त्यांच्या सर्जनशीलतेला व्यासपीठ मिळावे या उद्देशाने सामाजिक संदेश असलेल्या पतंग निर्मिती व हलव्याचे दागिने निर्मिती असे दोन उपक्रम उत्साहात पार पडले.



सामाजिक संदेश असलेल्या पतंग निर्मिती या उपक्रमात एकूण २४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी पर्यावरण संरक्षण, स्वच्छता, एकता, स्त्री सशक्तीकरण यांसारख्या विषयांवरील सामाजिक संदेश पतंगांवर आकर्षक पद्धतीने साकारले. तसेच हलव्याचे दागिने निर्मिती उपक्रमात १९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन पारंपरिक समारंभासाठी उपयुक्त व कलात्मक दागिने तयार केले.


या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य प्रताप महाडिक यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे सांस्कृतिक वारसा जपला जातो, असे मत व्यक्त केले. त्याच बरोबर प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या सहभागासाठी प्रमाणपत्र देण्याचे घोषित केले. विद्यार्थी अशा पारंपारिक उपक्रमांमध्ये हिरीरीने सहभागी होत आहेत याबद्दल प्राचार्यांनी समाधान व्यक्त केले.महाविद्यालयाचे समन्वयक डॉ. दत्तात्रय घोडके सर, सांस्कृतिक समितीच्या अध्यक्षा प्रा. जयश्री दहाट तसेच समिती सदस्य प्रा. समिधा पाटील, प्रा. सीमा शिंदे व प्रा. चिन्मयी वैद्य यांनी उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मार्गदर्शन केले. या उपक्रमास महाविद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षक इतर कर्मचारी उपस्थित होते.

स्पर्धेचे परीक्षण प्रा. योगिता पाटील आणि डॉ. प्राजक्ता पाटील यांनी केले. सामाजिक संदेश असलेल्या पतंग निर्मिती स्पर्धेत कु. प्राची प्रदीप डिके हिने प्रथम क्रमांक तर भूमिका संतोष म्हात्रे हिने द्वितीय क्रमांक तसेच वंशिका गणेश साळुंखे हिने तृतीय क्रमांक पटकावला तर ओमकार गोपाल देशमुख या विद्यार्थ्याने उत्तेजनार्थक क्रमांक पटकावला त्याचबरोबर हलव्याचे दागिने निर्मिती यामध्ये हिमेश्री रविंद्र पाटील हिने प्रथम तर रेश्मा पांडुरंग हटकर हिने द्वितीय तसेच गायत्री ज्ञानेश्वर म्हात्रे हिने तृतीय क्रमांक पटकावला .

**दुखवटा**

**वसुधा मुद्राळे**

**पाली :** समाजसेविका



वसुधा सुरेश मुद्राळे (वय ६३ वर्षे) यांचे सोमवारी (ता.१२) अल्पशा आजाराने निधन झाले. जिल्हा परिषद शाळेचे माजी मुख्याध्यापक सुरेश मुद्राळे यांच्या त्या पत्नी होत्या. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगी, दोन मुलगे, जावई, सुना व नातवंडे असा आप्त परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी बुधवारी (ता. २१) बोर्ली पंचतन स्मशानभूमी येथे होणार आहे. तर उत्तरकार्य शनिवारी (ता. २४) चिंचबादेवी रोड, बोर्ली पंचतन ता. श्रीवर्धन येथे राहत्या घरी होणार आहे.

# मुले पळवणाऱ्यांवर पोलिसांचा वॉच

## उरणमध्ये प्रकार वाढल्याने पालकांनाही सतर्कतेचे आवाहन

**उरण : बातमीदार**

उरणमध्ये लहान मुले व मुली पळवण्याचे प्रमाण वाढत असल्याने पालकांनी सावधानता बाळगणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात लहान मुले पळवण्याचे, ती बेपत्ता होण्याचे प्रमाण वाढत आहे, असे एनसीआरबीच्या प्रकाशित झालेल्या आकडेवारीनुसार हे प्रमाण २०२१ ते २०२४ या काळात जवळपास ३० टक्क्यांनी वाढले आहे.

तर लहान मुलांना पळवून, नंतर त्यांना कामाला जुंपणाऱ्या, त्यांना भीक मागायला लावणाऱ्या आंतरराज्य टोळ्या तयार झाल्या आहेत. या टोळ्या सर्रास लहान मुलं पळवत आहेत आणि यावर सरकार नक्की काय कारवाई करत आहे हेच समजत नाही, असे राज ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांना



लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे. उरणमध्ये बोरी येथे लहान मुले पळविण्याचा प्रयत्न झाला मात्र स्थानिक नागरिकांनी तो प्रयत्न हाणून पाडला. या संदर्भात उरण पोलीस ठाण्यात बैठकसुद्धा संपन्न झाली आहे. बोरी किंवा उरणमधील इतर भागात खरच मुले पळविणारी टोळी आले आहेत का याचा अधिक तपास करीत असल्याचे तसेच नागरिकांनी कोणत्याही अफवाला बळी पडू नका, असे आवाहन उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हानीफ मुलाणी यांनी केले आहे.

आपल्या परिसरात कोणतेही अनोळखी, संशयास्पद व्यक्ती आढळून आल्यास त्वरित उरण पोलीस ठाण्यात संपर्क करावे असेही त्यांनी नागरिकांना आवाहन केले आहे. उरणमधील विविध व्हाट्सअप ग्रुप वर लहान मुले चोरल्याचे अनेक संदेश व्हायरल होत आहेत. त्यामुळे उरण मधील जनता मुले पळविण्याच्या या मेसेजने भयभीत झाले आहेत. त्यामुळे सर्वांनी योग्य ती खबरदारी घेण्याचे आवाहन उरण पोलीस ठाण्यामार्फत करण्यात आले आहे. मुले चोरणारी टोळी सक्रिय आहे का याचा तपास पोलीस करीत आहेत.

### अशी घ्या दक्षता

मुलांना अनोळखी व्यक्तींसोबत न जाण्याची सूचना करा.

मुलांना घराबाहेर जाण्यापूर्वी पालकांना कळवण्याची सूचना करा मुलांना सुरक्षित मार्गाने शाळेत जाण्याची व्यवस्था करा.

मुलांना मोबाइल फोन वापरण्याची सूचना करा आणि त्यांचा वापर कसा करावा हे शिकवा.

मुलांना इंटरनेट सुरक्षिततेबद्दल शिकवा आणि त्यांना अनोळखी व्यक्तींसोबत ऑनलाईन संवाद न साधण्याची सूचना करा.

# पनवेल येथे चला परत निसर्गाकडे शिबिर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

संवेदना चॅरिटेबल संस्था पनवेलतर्फे चला परत निसर्गाकडे या एक दिवसीय राज्यस्तरीय शिबीराचे आयोजन आगरी समाज हॉल पनवेल येथे करण्यात आले. या वेळी चारशे पन्नास शेतकरी, नागरिक तसेच निसर्गप्रेमी व्यक्ती उपस्थिती होत्या.

रासायनिक शेती, सेंद्रिय शेती इतर शेती पद्धती पेक्षाही वेगळ्या असलेल्या सुभाष पाळेकर शेतीतील पोषक तत्वाने भरपूर असलेले विषमुक्त अन्न समजून घेणे, शेतकरी कुटुंबाला संपूर्ण अन्न व आर्थिक स्वावलंबन देणारी अशी समृद्ध शेती व्यवस्था उभी करणे, शहरी भागातील ग्राहकांना सुभाष पाळेकर कृषीचे विषमुक्त अन्न उपलब्ध कसे करून देता येईल यासाठी परसबाग, छतशेतीला प्रोत्साहन देणे आणि त्यासाठी मार्गदर्शन करणे तसेच शहरी ग्राहकांना विषमुक्त औषधी तत्वाने समृद्ध पोषक अन्नपदार्थ देणारी शेतकरी-ग्राहक व्यवस्था निर्माण करणे इ. उद्देश या शिबिराचा होता.

या एक दिवसीय शिबिरात प्रमुख मार्गदर्शक गुरुवर्य, भारतीय अध्यात्मिक कृषी शास्त्रज्ञ, कृषी ऋषीं पद्मश्री डॉ. सुभाष पाळेकर गुरुजींचे मार्गदर्शन लाभले होते. प्रमुख पाहुण्या सुनीता जोशी समाजिक कार्यकर्त्या, मान्यवर अतुल दि. बा. पाटील अध्यक्ष पनवेल उरण आगरी समाज हॉल, बी. पी. म्हात्रे सर समाजिक कार्यकर्ते, सुनेत्रा प्रसाद गवाणकर संस्थापिका अध्यक्षा संवेदना चॅरिटेबल संस्था, सर्व संवेदना पदाधिकारी सदस्या, एस. पी. के. जनआंदोलनाचे सर्व कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते.

# पनवेल बसस्थानक परिसरात होणार सर्वंकष स्वच्छता मोहीम

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सर्वच बसस्थानक परिसरात दर १५ दिवसांनी सर्वंकष स्वच्छता मोहीम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रवाशांना अधिक स्वच्छ, सुरक्षित व आरोग्यदायी सुविधा मिळाव्यात, तसेच एसटीची सकारात्मक प्रतिमा अधिक बळकट करण्याचा प्रयत्न यामधून केला जाणार आहे. त्यानुसार पनवेल आगारातही ही मोहीम राबविली जाणार आहे.

परिवहन खात्याचा पदभार प्रताप सरनाईक यांनी घेतल्यापासून अचानक भेटी देऊन बसस्थानकांची ते पाहणी करतात. त्यातून बसस्थानकात काही चुकीचे आढळले, अस्तच्छता आढळली तर अधिकाऱ्यांना धारेवर धरले जात आहे. त्यानुसार एसटी महामंडळाच्या मोहिमेंतर्गत बसस्थानकातील विविध विभागांतील स्वच्छता दर १५ दिवसांनी करण्यात येणार आहे. पिण्याच्या पाण्याच्या ठिकाणी स्वच्छता व नियमित देखभाल ठेवण्याच्या सूचनाही दिल्या आहेत.

यामध्ये स्वच्छतागृहाची स्वच्छता कितपत राखली जाते, यालाही गुण असल्याने विशेष लक्ष दिले जात होते. बसस्थानकात एकाच वेळी लाखो प्रवासी आलेले असतात. त्यामुळे कितीही इच्छा असली तरी स्वच्छता राखणे अवघड होत असते, पण ते राखण्याची खबरदारी घेतली जाणार आहे.

# मकरसंक्रांतीच्या निमित्ताने गव्हाण विद्यालयात विविध उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मकरसंक्रांतीचा सण रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये बुधवारी (दि.१४) वैविध्यपूर्ण उपक्रमांनी साजरा करण्यात आला. इयत्ता सातवी अ च्या वर्गाच्या वतीने वर्गशिक्षिका सारिका ठाकूर यांच्या आटोपशीर नियोजनात साजरा झालेला हा उत्सव वैविध्यपूर्ण स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला वाव देणारा ठरला.

इयत्ता पाचवी ते सातवी मुलांसाठी पतंग बनवणे आणि मुलींसाठी सुगडी सजावट हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता.तर इयत्ता आठवी ते नववीच्या मुलांसाठी ग्रीटिंग कार्ड तयार करणे आणि मुलींसाठी आरती सजावटीचे ताट तयार करणे अशा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या शुभहस्ते पारतोषिकस्वरूप



भेटवस्तू देवून गौरविण्यात आले.

सुगडी सजावट – प्रिन्सी खोत, भार्गवी राजेंद्र घरत, सोनाक्षी मुकेश सहानी, भेट कार्ड तयार करणे – कार्तिकी रणजीत कोळी, अभिजीत हनुमंत जाधव, पूर्वी प्रल्हाद ठाकूर, पतंग बनविणे – अरबाज आजम खान, रसिका भीमराव पाईकराव, मंथन मांडवकर,आरती ताट सजावट – प्रथम क्रमांक अनुराधा चव्हाण वर्गशिक्षिका सारिका ठाकूर यांचेवतीने देण्यात सर्व स्पर्धेतील विजेत्यांना शालोपयोगी भेटवस्तू देवून प्रोत्सहित करण्यात आले.

प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, रविंद्र भोईर, देवेंद्र म्हात्रे, सागर रंधवे, प्रशांत परदेशी आणि सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.

दरम्यान, शालेय पोषण आहार विभागाच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना तिळगूळाचे स्वादिष्ट मिश्रण असणाऱ्या 'राजकमल' चिक्किची पाकिटे पूरक आहार म्हणून वितरित करण्यात आली. पोषण आहार विभागाचे प्रमुख विशांत ठाकूर यांच्या संकल्पनेतून सदर पूरक आहार वाटण्यात आला.

# दिव्यांग, ज्येष्ठ मतदारांना मतदान केंद्रांवर विशेष मदत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणूका ६५६ मतदान केंद्रांत ७८ जागांसाठी मतदान प्रक्रिया पार पडत आहे. या प्रक्रियेत दिव्यांग व ज्येष्ठ मतदारांचा सहभाग वाढावा यासाठी पनवेल महापालिकेच्या वतीने मतदान केंद्रांवर विशेष सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

दिव्यांग व ज्येष्ठ मतदारांना केंद्रात सहज प्रवेश मिळावा यासाठी रॅम्प, व्हीलचेअर, अधिकचे तात्पुरते लाकडी रॅम्प, स्वयंसेवकांची मदत तसेच आवश्यक मार्गदर्शनाची व्यवस्था करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे दिव्यांग व ज्येष्ठ मतदारांना सुलभपणे आपला मतदानाचा हक्क बजावता येत आहे. सुविधांनी युक्त असे सर्व समावेशक व सुलभ मतदान प्रक्रियेस पनवेल महापालिका प्राधान्य देत आहे. दिव्यांग व ज्येष्ठ मतदारांनी याबद्दल महापालिकेचे समाधान केले आहे.





# प्रजापती संस्थेचे वार्षिक अधिवेशन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रजापती समाज विकास मंडळ रजि. या राष्ट्रीय सामाजिक संस्थेचे २१वे वार्षिक अधिवेशन रविवार, ११ जानेवारी रोजी के. ए. बांठिया माध्यमिक विद्यालय सभागृह, सेक्टर-१८, नवीन पनवेल, नवी मुंबई येथे अत्यंत भव्य व उत्साहपूर्ण वातावरणात मोठ्या आनंदाने झाले.

या अधिवेशनाचे उद्घाटन राजेश प्रजापती (अग्रगण्य बांधकाम व्यावसायिक), डॉ. भगवानदास प्रजापती (माजी जीएम, ओएनजीसी), के. एन. वर्मा (माजी महाव्यवस्थापक, मझगांव डॉक लिमिटेड), राजेश कुमार प्रजापती, ए. के. कुंभार आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी महाराजा दक्ष प्रजापती, श्रीसंत श्रीयादे माता व संत शिरोमणी संतश्री गोरा कुंभार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना वंदन करण्यात आले. अधिवेशनात प्रमुख पाहुणे राजेश प्रजापती (अग्रणी बांधकाम व्यावसायिक), कृष्णकुमार वर्मा (वरिष्ठ शास्त्रज्ञ, बार्क), राजेश कुमार



प्रजापती (उद्योजक), सिकमी प्रसाद प्रजापती (समाजसेवक), दिनेश प्रजापती (समाजसेवक), ए. के. कुंभार (उद्योजक), ईश्वरीलाल प्रजापती (समाजसेवक), पर्वदीन प्रजापती (उद्योजक), एल. सी. राठौर प्रजापती, ॲड. निहारिका प्रजापती (राष्ट्रीय अध्यक्षा – युवा महिला प्रकोष्ठ), डॉ. राममिलन प्रजापती (प्रदेश अध्यक्ष, उत्तर प्रदेश), कृष्णा प्रजापती (प्रदेश अध्यक्षा, राजस्थान), आशाताई कुंभार (प्रदेश अध्यक्षा, महाराष्ट्र), ओमप्रकाश प्रजापती (संपादक, उत्तरशक्ती हिंदी दैनिक) आदी उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे राजेश प्रजापती यांनी विशेषतः उच्च शिक्षण घेणाऱ्या (डॉक्टर, अभियंते) गुणवंत विद्यार्थ्यांना आर्थिक मदत, व्यवसाय व रोजगारनिर्मिती, समाजाची एकजूट आणि सर्व समाजघटकांसोबत खांद्याला खांदा लावून पुढे जाण्याची गरज अधोरेखित केली.

अधिवेशनासाठी गजेंद्र प्रजापती, सूर्यनाथ परदेसी, काशीनाथ परदेसी, सर्वजीत प्रजापती, चंद्रशेखर प्रजापती, डॉ. ज्ञानप्रकाश प्रजापती, गोविंद प्रजापती, पूनम प्रजापती, विशाल जोगिंदर प्रजापती, राजेंद्र प्रजापती, अजय प्रजापती, गोवर्धन प्रजापती, संजय प्रजापती, इंदर प्रजापती, कुलदीप प्रजापती, कैलाश प्रजापती, भगवानदास प्रजापती, आर. प्रजापती, नीलम प्रजापती, मोहन प्रजापती, मन्नूलाल प्रजापती, इंदल प्रजापती, प्रद्युमन प्रजापती, महेश प्रजापती, अशोक प्रजापती, जयप्रकाश प्रजापती, वशिष्ठ प्रजापती, प्राणनाथराम प्रजापती, रोहित पन्नू प्रजापती, सागर प्रजापती, विशाल प्रजापती, लवकुमार प्रजापती, राकेश कुमार प्रजापती, इंद्रकुमार प्रजापती, आकाश प्रजापती, सूरज भगवानदास प्रजापती, आशीष प्रजापती, सपना प्रजापती आदींनी परिश्रम घेतले.



**पनवेल : प्रभाग १४चे भाजपचे उमेदवार इक्बाल काझी यांनी मतदानाचा हक्क बजावला.**



**पनवेल : प्रदीप आंग्रे यांच्या ९० वर्षीय आईने मतदानाचा हक्क बजावला.**

# वीर वाजेकर कॉलेजमध्ये 'दिबां'ची जयंती साजरी



**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या, वीर वाजेकर, आर्ट, सायन्स व कॉमर्स कॉलेज, महालण विभाग फुंडे येथे लोकनेते दि.बा. पाटील यांची मंगळवारी (दि. १३) जयंती करण्यात आली.

उरण, पनवेल व रायगडचे भाग्यविधाते लोकनेते दि. बा. पाटील यांच्याविषयी मनोगत व्यक्त करतांना प्र. प्राचार्य, डॉ.आमोद ठक्कर यांनी आपले अनुभव सांगितले.

कार्यक्रमाचे अभ्यासपूर्ण प्रास्तविक डॉ. सुजाता पाटील यांनी केले.कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल पालवे,प्रा.गजानन चव्हाण तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. डॉ.सी.डी.धिंदळे यांनी आभार मानले.

# रामशेठ ठाकूर कॉलेजच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील शैक्षणिक सहल समितीने विद्यार्थ्यांसाठी ७ ते १४ जानेवारी दरम्यान शैक्षणिक सहलीचे आयोजन गेले होते. या शैक्षणिक सहलीचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना वर्गातील सैद्धांतिक ज्ञानासोबत प्रत्यक्ष कार्यानुभव मिळवून देणे हा होता.

या सहलीमध्ये एकूण ९५ विद्यार्थी सहभागी झाले होते, तर त्यांच्यासोबत पाच प्राध्यापक उपस्थित होते. या सहलीमध्ये सहल समितीचे समन्वयक म्हणून प्रा. विशाल देशमुख यांनी महत्त्वाची भूमिका बजावली त्यांच्यासोबत प्रा. प्रतीक्षा पाटील, प्रा. आनंद शेलार, प्रा. सर्वेश महाजन आणि प्रा. अर्पिता नायक यांनीही सहलीच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी विशेष परिश्रम घेतले.

ही शैक्षणिक सहल ७ जानेवारी रोजी सुरू झाली. सहलीच्या नियोजित कार्यक्रमानुसार १० जानेवारी रोजी विद्यार्थ्यांनी डोड्डाबेट्टा चहा कारखान्यास भेट दिली. त्यानंतर १२ जानेवारी रोजी विद्यार्थ्यांनी म्हैसूर येथील केएसआयसी म्हैसूर सिल्क फॅक्टरीला भेट दिली.

या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना रेशीम उत्पादनाची प्रक्रिया, पारंपरिक कारागिरी, तसेच म्हैसूर सिल्कच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाची सखोल माहिती मिळाली. १३ जानेवारी रोजी विद्यार्थ्यांनी बंगळुरू येथील यू. आर. राव उपग्रह केंद्राला भेट दिली. या ठिकाणी चांद्रयान-तीन मोहिमेचे महत्त्व, त्यामागील वैज्ञानिक संशोधन, तसेच भारताच्या भविष्यातील अंतराळ मोहिमा आणि दीर्घकालीन वैज्ञानिक उद्दिष्टांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

प्रभारी प्राचार्य डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या सहलीचे अत्यंत यशस्वीरित्या आयोजन केल्याबद्दल सहल समितीतील सर्व सदस्य, सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे व सहल समितीचे समन्वयक यांचे अभिनंदन केले. ही संपूर्ण सहल भार्गव हॉलिडेज एज्युकेशन टूर ऑपरेटर यांच्या सहकार्याने यशस्वी झाली.



# खारघरमध्ये वाचन संस्कृती जतन कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गोखले एज्युकेशन सोसायटी संचलित खारघर विधी महाविद्यालयमध्ये वाचन संस्कृती जतन करण्याच्या उद्देशाने विशेष कार्यक्रमाचे सोमवार १२ जानेवारी रोजी आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे व ग्रंथसंस्कृतीचे महत्त्व अधोरेखित करणे हा होता. या वेळी विविध उपक्रम आयोजित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. श्रुती निलेश काळे जाधव या उपस्थित होत्या. त्यांनी या वेळी अवांतर वाचनासाठी पुस्तक प्रदर्शनाला भेट दिली तसेच पुस्तक सारांश कथन स्पर्धेचे परीक्षक म्हणून परीक्षण केले. आपल्या भाषणात त्यांनी वाचनामुळे वैचारिक विकास, कायद्याचे सखोल ज्ञान आणि



व्यक्तिमत्त्व कसे घडते, यावर मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांनी पुस्तक प्रदर्शन भेट देऊन प्रदर्शनातील पुस्तके घेऊन सामुहिक वाचन उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये रोहिणी अमराळे,अंकिता तेलंग, रितिका माटे, सुप्रिया शेडगे, श्रीनिवास राव, सय्यद जफर, सुप्रिया विश्वकर्मा, सोनल चव्हाण, राहुलदेव मिश्रा, ओंकार देवरे, प्रवीण कांबळे, जयश्री येवले या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

पुस्तक सारांश कथन स्पर्धा यामध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या वाचलेल्या पुस्तकाबद्दल विचार व मते मांडली. बाबुराव भारक्षे, राहुलदेव मिश्रा, सोनल चव्हाण, श्वेता सोनवले, हुमा खान, कीर्ती त्रिपाठी, सपना जैन, प्रवीण कांबळे, जयश्री येवले यांनी या उपक्रमात सहभाग घेतला.

ग्रंथालय प्रमुख दिप्ती भिसे यांनी वाचन कार्यशाळेत विद्यार्थ्यांना वाचनाची गरज काय, वाचनाच्या योग्य अयोग्य पद्धती, वाचन कौशल्य, सुधारित वाचन,काय वाचावे, वाचन आनंद वाचनामागील उद्दिष्टे यावर पीपीटीद्वारे सादरीकरण करून मार्गदर्शन केले. एलएलबी बीएएलएलबी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग व प्रतिसाद या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य ठरला.

कार्यक्रमाचे आयोजन ग्रंथालय विभाग समितीच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्रंथालय समिती, सर्व शिक्षक कर्मचारी साक्षी रहाटे, समरिद्धी श्रीवास्तव शिक्षकेतर कर्मचारी रत्नेश तांबे, राजश्री चंदनकर यांनी विशेष योगदान दिले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मानसी घरत सोबत वेदांत पालवे, ओंकार देवरे, कुणाल गोरखे, प्रवीण कांबळे या सर्व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटी आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## संपादकीय

# विजयाची खात्री


राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीसाठी गुरुवारी मतदान झाले. मतदान संपल्यानंतर समोर आलेल्या सगळ्या एक्झिट पोलनी भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना शिंदे गट या निवडणुकीमध्ये बाजी मारणार असल्याचे म्हटले. तसेच अवघ्या देशाचे लक्ष लागलेल्या मुंबई महापालिका निवडणुकांमध्ये ठाकरे बंधूंना धक्का लागणार असल्याचेही या पोलमध्ये दिसले.

**काही किरकोळ तक्रारी वगळता राज्यभरातील २९ महापालिकांच्या निवडणुकांचे मतदान गुरुवारी शांततेत पार पडले. यात मुंबईमध्ये एक सदस्यीय प्रभाग असल्याने मुंबईकरांनी एकच मत दिले तर उर्वरित २८ महापालिकांमध्ये बहुसदस्यीय प्रभाग पद्धत असल्याने तेथे मतदारांना चार मते द्यावी लागली. राज्यातील २६ ते २७ महापालिकांमध्ये महायुतीचाच महापौर होईल. मुंबईमध्ये महायुतीला स्पष्ट बहुमत मिळेल तसेच निवडणुकांनंतर राज्यात भाजपच सर्वात मोठा पक्ष असेल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी व्यक्त केला होता. महाराष्ट्र मोदीजींच्याच पाठीशी आहे असेही त्यांनी म्हटले होते. राज्य निवडणूक आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या लोकशाहीतील तिसऱ्या स्तरावरील या निवडणुका लोकांच्या रोजच्या जगण्यातील बाबींशी थेट निगडित असतात. त्यादृष्टीने त्यांचे महत्त्व असते. सत्तेचा उगम तळागाळातील सामान्य माणसापासून व्हावा या विचारातून १९९२ मध्ये घटनादुरुस्तीने लोकशाहीचे विकेंद्रीकरण केले गेले. अशा या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका काही वर्षे न्यायालयीन कचाट्यात अडकल्या होत्या. त्यामुळे काहीशा विलंबाने होणाऱ्या महापालिका निवडणुकांसाठी राज्यभरात मोठा उत्साह दिसून आला. मतदानाचे दिवशी काही ठिकाणी कार्यकर्त्यांमध्ये झालेली वादावादी, दुबार मतदानाचे आरोप–प्रत्यारोप वगळता मतदान शांततेत पार पडले. मात्र या दिवशी आश्चर्यकारकरित्या मोठ्या प्रमाणावर चर्चेत आला किंवा आणला गेला तो मतदानाचे वेळी बोटावर लावली जात असलेली शाई पुसली जात असल्याचा मुद्दा. ठाकरे बंधूंनी व विरोधकांपैकी अन्य काही नेत्यांनी यासंदर्भात आरोप केले. समाज माध्यमांवर काही व्हिडिओही टाकले गेले. परंतु शाई पुसली जात नाही असे सांगणारे मतदारही पुढे आले. जाणूनबुजून यासंदर्भात संभ्रम पसरवला जातो आहे असेही मग समोर आले. राज्य निवडणूक आयोग २०११ पासून मतदानाचे वेळी बोटावर खूण करण्यासाठी मार्कर पेन वापरतो आहे. त्यासंदर्भात याच निवडणुकांमध्ये असा संभ्रम पसरवणे चुकीचे आहे असे राज्य निवडणूक आयुक्तांनी पत्रकार परिषद घेऊन स्पष्ट केले. शाई सुकल्यानंतर पुसली जाऊ शकत नाही. यंदाची शाई वेगळी नाही. केंद्रीय निवडणूक आयोगाकडून जी शाई वापरली जाते तीच आपण वापरल्याचेही त्यांनी सांगितले. शाई पुसून पुन्हा मतदान करण्यास येण्याचा प्रयत्न कुणी केल्यास त्यांना नक्कीच कारवाईला सामोरे जावे लागेल असा इशाराही त्यांनी दिला. मुख्यमंत्री फडणवीस यांनी यंत्रणांवर अशातऱ्हेने प्रश्नचिन्ह उपस्थित करणे चुकीचे असल्याचे म्हटले. वास्तविक यंदाच्या महापालिका निवडणुका ठाकरे बंधूंसाठी मोठ्या प्रतिष्ठेच्या बनल्या आहेत. दोन्ही बंधू एकत्र आल्यानंतर होणाऱ्या या निवडणुका ही दोघांसाठीही एक मोठी परीक्षा असल्याचे म्हटले गेले आहे. मुंबई आणि राज्यात त्यांचा राजकीय प्रभाव टिकून राहणार की नाही हे या निवडणुकीत स्पष्ट होणार आहे. दरम्यान, भाजप व शिवसेना शिंदे गट मिळून मुंबईमध्ये जवळपास १३८ जागा येण्याचा अंदाज एका एक्झिट पोलने व्यक्त केला आहे. अर्थात शुक्रवारी संध्याकाळी चार वाजेपर्यंत प्रत्यक्ष निकाल हाती येऊन खरे चित्रही लगेच स्पष्ट होईलच.**

# राजिपमध्ये सत्तेसाठी युती-आघाडी करावी लागणार

राज्यातील १२ जिल्हा परिषदांच्या निवडणूका जाहीर झाल्या आहेत. त्यात रायगड जिल्हा परिषदेचादेखील समावेश आहे. जिल्हा परिषदेच्या ५९ व १५ पंचायत समित्यांच्या ११८ जागांसाठी निवडणूक होत आहे. सर्वांचे लक्ष आहे ते जिल्हा परिषद निवडणुकीत राजिपवर कुणाची सत्ता येईल याचीच सर्वांना उत्सुकता आहे.

राजिपमधील सत्तेसाठी ३० जागा जिंकाव्या लागणार आहे. रायगड जिल्ह्याची सध्याची परिस्थिती पाहता सर्वच राजकीय पक्षांची ताकद विभागली आहे. राजिपमध्ये स्वबळावर सत्ता आणणे कोणत्याच पक्षाला शक्य नाही. युती आणि आघाडी करूनच सत्ता आणावी लागणार आहे.



एकेकाळी रायगड जिल्ह्यात शेकाप आणि काँग्रेस हे दोनच प्रमुख पक्ष होते. त्यांचीच सत्ता आलटून पालटून असायची. त्यानंतर शिवसेनेने या जिल्ह्यात आपली ताकद वाढवली.या पक्षाने रायगड जिल्ह्यात खासदार, आमदार निवडून आणले, राजिपमध्ये सत्ता मिळवली. पंचायत समित्या जिंकल्या. १९९९मध्ये स्थापन झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसनेही जिल्हयात आपली ताकद वाढवली. हे होत असताना ज्यांची ताकद या जिल्ह्यात होती असे काँग्रेस व शेकाप मात्र कमकुवत झाले. एक काळ सुपूर्ण जिल्ह्यात ताकद असलेल्या काँग्रेसकडे जिल्ह्यातील एकही स्थानिक स्वराज्य संस्थेत सत्ता नाही. शेकापकडे केवळ अलिबाग नगर परिषद आहे.

रायगड जिल्हयात भाजपची फारशी ताकद नव्हती, मात्र मागील काही वर्षात केंद्र आणि राज्यातील सत्ता आल्यावर भाजपानेही जिल्ह्यात हातपाय पसरायला सुरुवात केली. नुकत्याच झालेल्या नगर परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिंदेंची शिवसेना आघाडीवर राहिली. इतर पक्षांनीदेखील यश मिळवले. जिल्ह्यात झालेल्या नगर परिषदांच्या निवडणुकीतदेखील वेगवेगळ्या ठिकाणी वगवेगळे पक्ष सत्तेत आले आहेत. त्यामुळे राजिप निवडणुकीतसुद्धा अशीच परिस्थिती असेल.

२०१७ साली झालेल्या रायगड जिल्हा परिषद निवडणूकीत २३ जागा जिंकत शेतकरी कामगार पक्ष सर्वांत मोठा पक्ष ठरला होता. त्या खालोखाल शिवसेनेने १८ जागा जिंकल्या होत्या. राष्ट्रवादी काँग्रेसला १२ तर काँग्रेस आणि भाजपला प्रत्येकी तीन जागा मिळाल्या होत्या. शेकाप आणि राष्ट्रवादी काँग्रेसने एकत्र येत जिल्हा परीषदेतील सत्ता मिळवली. आता रायगड जिल्ह्यातील राजकीय परिस्थीती बदलली आहे. शिवसेना फुटली. शेकापचे काही नेते पक्ष सोडून गेले. राष्ट्रवादी काँग्रेसदेखील दुभंगली आहे. याउलट रायगड जिल्ह्यात भाजपची ताकद वाढत आहे. त्यामुळे राजकीय समिकरणे बदलली आहेत.

रायगड जिल्हा परिषदेची सदस्य संख्या ५९ आहे. जर जिल्हा परीषदेत सत्ता आणायची असेल तर किमान ३० सदस्य निवडून आणावे लागणार आहेत. रायगड जिल्ह्याची सध्याची राजकीय परिस्थिती लक्षात घेता कोणताही राजकीय पक्ष स्वबळावर एकहाती सत्ता मिळवू शकत नाही. सत्तेत येण्यासाठी सर्वच पक्षांना युती आघाडीशिवाय पर्याय नाही.

लोकसभा आणि विधानसभा निवडणूक भाजपा, शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस यांनी महायुती करून लढवली. त्यांना त्यांना यश आले. लोकसभा निवडणुकीत महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे विजयी झाले. त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणूकीत जिल्हयातील सातही आमदार महायुतीचे निवडून आले. महाविकास आघाडील एकही आमदार निवडून आणता आला नाही. महायुतीने यश मिळवले तरी त्यानंतर महायुतीमधील घटक पक्षांमध्ये वाद निर्माण झाले. महायुतीचे घटकपक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेतून सध्या विस्तव जात नाही अशी स्थिती आहे. त्यामुळे जिल्ह्यात हे दोन्ही पक्ष एकत्र येणं सध्या तरी शक्य दिसत नाही.

दोनच दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी सांगितले की आमची भाजपशी बालणी सुरू आहे. त्यांनी शिवसेनेचे नावदेखील घेतले नाही. शिवसेना शिंदे गटानेही स्वबळावर निवडणूक लढवण्याची तयारी केली आहे. एकूणच सध्याची रायगड जिल्ह्यातील राजकीय परिस्थिती पाहता सर्वच राजकीय पक्षांचा विचार करता कोणताही एक पक्ष स्वबळावर राजिपमध्ये सत्ता मिळवू शकणार नाही. युती, आघाडी करावीच लागणार आहे.

# ‘हिंद-दी-चादर’ गुरू तेगबहादूर साहिबजी यांची अमर गाथा

मानवतेच्या इतिहासात काही अशी व्यक्तिमत्वे होऊन गेली, ज्यांनी केवळ स्वतःच्या धर्मासाठी नव्हे, तर दुसऱ्यांच्या धार्मिक स्वातंत्र्यासाठी आणि मानवाधिकारांसाठी आपल्या प्राणांची आहुती दिली. शीखांचे नववे गुरू तेगबहादूर साहिबजी हे त्यापैकीच एक महान युगपुरुष आहेत. त्यांच्या ३५०व्या शहीदी समागम कार्यक्रमाच्या निमित्ताने त्यांच्या अतुलनीय बलिदानाचे स्मरण करणे, हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे.

श्री गुरु तेगबहादूर हे शीख धर्माचे नववे गुरू होते, त्यांना ‘हिंद–दी–चादर’ म्हणून ओळखले जाते. श्री गुरु तेगबहादूर यांनी शीख धर्मात प्रार्थना, परोपकार, सेवा, साधेपणा, इतरांच्या सेवेला महत्त्व आणि निर्भीडपणा यांचा प्रचार केला, त्यांचे प्रवचन व भजन यांचा ‘गुरु ग्रंथ साहिब’ यामध्येदेखील समावेश आहे. श्री गुरु तेगबहादूर यांनी १७व्या शतकामध्ये तत्कालीन शासनकर्त्यांच्या अन्याय व अत्याचाराविरुद्ध आवाज उठवून धर्मस्वातंत्र्य आणि मानवी हक्कांसाठी बलिदान देऊन भारताच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक अस्मितेचे रक्षण केले. त्यांच्या बलिदानामुळे संपूर्ण भारतात तसेच शीख धर्मात शौर्य आणि त्यागाची परंपरा अधिक मजबूत झाली. मुघल सम्राटांच्या विरोधात जाऊन भाई लकीशा बंजारा यांनी नववे गुरु तेगबहादूर यांच्या पवित्र शरीरास आपला तांडा व घर जाळून अग्नी दिला. या बाबीस भारतीय इतिहासात अनन्य साधारण महत्त्व आहे.

गुरु तेगबहादूर यांना ‘हिंद–दी–चादर’ असे आदराने संबोधले जाते. जेव्हा मुघल शासकाच्या अत्याचाराने सीमा ओलांडली होती तेव्हा त्यांनी निधड्या छातीने उभे राहून भारतीय संस्कृतीचे रक्षण केले.

गुरुंना आणि त्यांच्या अनुयायांना दिल्लीत कैद करण्यात आले. त्यांना धर्मांतरासाठी प्रचंड मानसिक आणि शारीरिक त्रास देण्यात आला. मनोधैर्य खचवण्यासाठी त्यांच्या डोळ्यांदेखत त्यांच्या तीन प्रिय शिष्यांना क्रूरपणे शहीद करण्यात आले. तरीही, गुरु तेग बहादूरजी आपल्या तत्त्वांवर ठाम राहिले. ११ नोव्हेंबर १६७५ रोजी दिल्लीतील चांदणी चौकात त्यांनी शीश दिले, पण आपला धर्म आणि तत्व (सार) सोडले नाही.


**–प्रशांत सातपुते, जिल्हा माहिती अधिकारी, रत्नागिरी**



## बदलते तंत्रज्ञान

# ‘या’ उपकरणात डोसासुद्धा एका मिनिटांत होईल प्रिंट

आधुनिक तंत्रज्ञानामुळे विविध उपकरणांनी आपले दैनंदिन आयुष्य खूपच सुकर झाले आहे. कधी कधी आपला तवा जुना असल्यामुळे डोशाचे पीठ त्यावर चिकटून बसते; तर कधी आपल्याला हवा तसा अगदी कुरकुरीत डोसा तयार होत नाही. बरे चवीसाठी जरी हा पदार्थ खूप सुंदर लागत असला तरीही एकेक डोसा बनवत बसण्यात खूप वेळ जातो, मात्र सोशल मीडियावर beebomco या इन्स्टाग्राम अकाउंटने तुमच्या या सर्व प्रश्नांवरचे एक अत्यंत आधुनिक व भन्नाट असे उत्तर शोधून काढले आहे. या अकाउंटवरून टाकलेल्या व्हिडीओमधून चक्क एका ‘डोसा प्रिंटर’बद्दलची माहिती देण्यात आली आहे.



त्यानुसार कोणत्याही साधारण अशा प्रिंटरसारखे दिसणारे हे एक उपकरण आहे. मात्र, त्यामधून पेपर नव्हे, तर तुम्हाला हवे तसे डोसे अक्षरशः एका मिनिटात प्रिंट होऊन मिळतात. या प्रिंटरमध्ये मागच्या बाजूला एक ट्रे बसवण्यात आला आहे; ज्यामध्ये तुम्ही तुमचे डोशाचे तयार पीठ घालून, तुम्हाला हवी तशी जाडी पातळ ते जाड सेट करून डोसा प्रिंट करू शकता.

या प्रिंटरमधून तुम्हाला एका वेळेस पाच डोसे प्रिंट करून मिळू शकतात. तसेच डोशांचा कुरकुरीतपणाही तुम्ही मशीनमध्ये वेळ सेट करून ठरवू शकता. हा प्रिंटर स्वच्छ करणेसुद्धा अतिशय सोपे आहे. प्रिंटरच्या मागे असलेला ट्रे तुम्ही अगदी सहज काढून पाण्याखाली धुऊ शकता. तुम्हला हव्या त्या चवीचे पीठ यामध्ये घालता येऊ शकते, अशी माहिती या व्हिडीओवरून मिळते.

स्वयंपाकघरात अत्यंत उपयुक्त आणि झटपट डोसे बनवण्यासाठी फायदेशीर ठरणारे हे उपकरण ॲमेझॉन या ऑनलाईन शॉपिंग साईटवरही उपलब्ध आहे. हा डोसा मेकर किंवा प्रिंटर ‘इव्होशेफ’ कंपनीने बनवला असून, तो एक वर्षाच्या वॉरंटीसह सध्या १३,९९९ रुपयांना उपलब्ध आहे. या भन्नाट व अतिशय उपयुक्त अशा डोसा प्रिंटरचा हा व्हिडीओ शेअर झाल्यानंतर नेटकऱ्यांनी त्यावर अनेक मजेशीर प्रतिक्रिया दिल्या आहेत.

एकाने तर, जरी मी डोशाचे पीठ आणून किंवा घरी बनवून त्याचे डोसे प्रिंट करून घेतले तरीही त्यासोबत लागणारी चटणी, सांबार आणि बटाट्याची भाजी कोण बनवणार?,अशी मिश्कील प्रतिक्रिया दिली आहे .

# कलामहर्षी, चित्रपट निर्माते बाबूराव पेंटर

प्रसिद्ध महाराष्ट्रीय चित्रकार, शिल्पकार आणि चित्रपट–निर्माते व दिग्दर्शक बाबूराव पेंटर यांचे पूर्ण नाव बाबूराव कृष्णाजी मेस्त्री (मिस्त्री). त्यांचा जन्म कोल्हापूर येथे झाला. त्यांचे वडील सुतारकाम, लोहारकाम करीत होते. आज बाबूराव पेंटर यांचा स्मृतीदिन आहे. बाबूरावांचा लौकिक चित्रकार म्हणून असला, तरी त्यांना खरीखुरी कीर्ती लाभली ती त्यांनी केलेल्या चित्रपटक्षेत्रातील कामगिरीमुळे. आपले आतेभाऊ आनंदराव मेस्त्री यांच्या मदतीने त्यांनी ‘डेक्कन सिनेमा’ सुरू केला होता, पण तो लवकरच बंद पडला, त्यानंतर १९१३ मध्ये त्या दोघांनी बाबूराव रूईकर यांच्यासह ‘महाराष्ट्र सिनेमा’ या चित्रपट निर्मितिसंस्थेची निर्मिती केली; ती बंद करून पुढे १ डिसेंबर १९१७ रोजी आपल्या बंधूंच्या स्मरणार्थ बाबूरावांनी ‘महाराष्ट्र फिल्म कंपनी’ची स्थापना केली आणि १९१९मध्ये सैरंध्री या आपल्या कलात्मक मूकपटाची निर्मिती केली. कल्पकता, भव्यता, स्त्रियांनीच केलेल्या स्त्री भूमिका आणि पौराणिक काळातील राजवैभवाचे दर्शन हे या चित्रपटाचे वैशिष्ट्य होते. ७ फेब्रुवारी १९२० रोजी पुण्याच्या आर्यन सिनेमागृहात सैरंध्री प्रदर्शित झाला व लो. टिळकांनी हा चित्रपट पहिला (८ फेब्रुवारी १९२०). त्यांनी बाबूरांवाना ‘सिनेमा केसरी’ या उपाधीने गौरविले.



## निमित्त

महाराष्ट्र फिल्म कंपनीद्वारा बाबूरावांनी १९२०–३० या दशकात एकूण १७ चित्रपटांची निर्मिती केली. त्यांपैकी वत्सलाहरण (१९२१) व भक्त प्रल्हाद (१९२६) हे पौराणिक, तर सिंहगड (१९२३), कल्याण खजिना (१९२४), सती पद्मिनी (१९२४) व शहाला शह हे ऐतिहासिक आणि सावकारी पाश हा सामाजिक कथानकावरील वास्तववादी चित्रपट होय. सिंहगड हा त्यांचा चित्रपट अनेक दृष्टींनी महत्त्वपूर्ण ठरला. त्यातील रात्रीच्या लढाईचे चित्रिकरण त्याकाळी त्यांनी प्रज्योत दिव्याच्या (आर्क लँप) प्रकाशझोतात केले. विजेच्या प्रकाशात चित्रिकरण केलेला हा पहिला भारतीय चित्रपट होय.

पन्हाळा किल्ल्याच्या परिसरात केलेल्या चित्रिकरणामुळे तो बाह्यचित्रिकरणाच्या दृष्टीनेही पहिलाच चित्रपट ठरतो. याच चित्रपटाच्या वेळी मुंबईला प्रेक्षकांची अलोट गर्दी लोटल्यामुळे तिचे नियंत्रण सरकारला करावे लागले. तेव्हापासून सरकारचे लक्ष चित्रपटाकडे वेधले गेले व या चित्रपटापासूनच करमणूक कर बसविण्यात आला. या चित्रपटाच्या जाहिरातीसाठी बाबूरावांनी शिलामुद्रण केलेली ३.४८ बाय ६.९६ मीटर (१० बाय २० फूट) लांबी–रुंदीची भित्तिपत्रके तयार केली होती. ती चांगलीच प्रभावी ठरली. त्या दृष्टीनेही चित्रपटांच्या भित्तिपत्रकांचे जनकत्व बाबूरावांकडे जाते. त्यांच्या सैरंध्री या चित्रपटातील कीचकवधाचे दृश्य परिणामकारक होते, ते पाहून काही प्रेक्षक मूर्च्छित पडले. कल्याण खजिना, सती पद्मिनी व सिंहगड या त्यांच्या मूकपटांना यूरोपमधील वेम्बले येथील चित्रपट प्रदर्शनात सुवर्णपदके लाभली. त्यांच्याच तालमीत तयार झालेले व्ही. शांताराम, एस. फत्तेलाल, विष्णुपंत दामले व केशवराव धायबर यांनी तो वारसा पुढे चालविला.शिल्पकलेत मृद्–शिल्पांपासून तर ब्राँझच्या ओतकामापर्यंतची सर्व कामे ते स्वत:च करीत. नंतर त्यांनी त्यासाठी स्वत:ची ओतशाळाही उभारली होती. त्यांनी महात्मा गांधी, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले इत्यादींच्या केलेल्या शिल्पाकृती खूप नावाजल्या. त्यांचे कोल्हापूर येथे निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# सफरचंद खाण्याने ‘या’ आजारांपासून राहाल लांब

अनेकांना सफरचंद खायला आवडतं. चवीला गोड असलेलं हे फळ आरोग्यासाठीदेखील तितकंच महत्त्वाचं आहे. लाल सफरचंद आरोग्यासाठी खूप चांगले मानले जाते. डॉक्टर देखील रोज एक सफरचंद खाण्याचा सल्ला देत असतात. सफरचंदमध्ये व्हिटॅमिन सी, फायबर, मिनरल्स आणि अँटी–ऑक्सिडंट्स असतात. सफरचंद खाल्ल्याने पोटात भर राहते. ज्यामुळे वजन देखील वाढत नाही. सफरचंदांमध्ये कॅलरीजही चांगल्या प्रमाणात असतात. चला आज जाणून घेऊयात रोज सफरचंद खाण्याचे आरोग्य फायदे...



**वजन कमी करण्यात मदत**

रोज सफरचंद खाल्ल्याने पोटात भर राहते ज्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते. सफरचंदमध्ये भरपूर प्रमाणात फायबर आढळते. यामध्ये पाण्याचे प्रमाणही अधिक असते. सफरचंद खाल्ल्याने जेवणावर नियंत्रण ठेवता येते. त्यामुळेच वजन कमी करण्यासाठी ही सफरचंद खाण्याचा सल्ला दिला जातो

**ह्दयाच्या आरोग्यासाठी चांगले**

फायबरने समृद्ध असलेला सफरचंद कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी देखील मदत करतो. यामुळे कोलेस्ट्रॉल कमी होऊन ह्दयाचे आरोग्य सुधारते. सफरचंद खाल्ल्याने शरीरात कोलेस्ट्रॉल जमा होत नाही.

**पचन चांगले होते**

पोटाशी संबंधित समस्या असेल तर त्यांनी सफरचंद खालले पाहिजे, कारण यामध्ये भरपूर फायबर आढळते जे बद्धकोष्ठतेची समस्या दूर करते. सफरचंदमधून शरीराला पेक्टिनचे प्रमाणही चांगले मिळते.

**रोगप्रतिकारशक्ती वाढते**

सफरचंद खाल्ल्याने प्रतिकारशक्तीदेखील वाढते. रोगप्रतिकारक शक्ती सुधारली तर तुम्ही अनेक आजारांपासून लांब राहू शकता. सफरचंद खाणारे व्यक्ती लवकर आजारी पडत नाहीत.

शरीरात असलेले विषारी द्रव्ये यकृत काढण्याचं काम करते. यकृत डिटॉक्स करण्यासाठी सफरचंद खाऊ शकता.

**मधुमेह होण्याची शक्यता कमी**

तुम्ही जर दररोज एक सफरचंद खालले तर तुम्हाला मधुमेह होण्याची शक्यतादेखील कमी होऊन जाते. अभ्यासात असे आढळून आले आहे की, सफरचंद खाल्ल्याने मधुमेहाचा धोका १८ टक्क्यांनी कमी होतो. त्यामुळे तुम्ही तुमच्या आहारात एक सफरचंदाचे सेवन केलेच पाहिजे.

# निवडणूक पूर्ण होईपर्यंत धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने आणि उपोषणावर निर्बंध

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जिल्हा परिषद व पंचायत समिती, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणूक २०२६ जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या निवडणूकिची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत संपूर्ण रायगड जिल्ह्यात सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय,संस्था, शासकीय विश्रामगृह, सार्वजनिक ठिकाणे, रस्त्याच्या ठिकाणी धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर निर्बंध घालण्यात आले असल्याचे आदेश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी आज जारी केले आहेत.

मा.भारत निवडणूक आयोगाने दि.१३ जानेवारी २०२६ रोजीच्या प्रसिध्दी पत्रकान्वये जिल्ह्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक-२०२६ चा कार्यक्रम जाहीर केला आहे. निवडणूक कार्यक्रम घोषीत केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आली आहे. रायगड जिल्ह्यात गुरुवार, दि.५ फेब्रुवारीला मतदान तर शनिवार, दि.७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी होणार आहे. निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून जिल्हादंडाधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी, तालुका दंडाधिकारी कार्यालय तसेच जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय, शासकीय विश्रामगृह, सार्वजनिक ठिकाणे, रस्त्यावर कोणत्याही राजकीय पक्षाने, व्यक्तीने, संघटनेने, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने किंवा त्याच्या हितचिंतकाने धरणे, आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर (आचारसंहितेच्या कालावधीमध्ये) निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात येत आहेत. तसेच सर्व संबंधितांना नोटीस देऊन त्यांचे म्हणणे ऐकून घेणे सद्यः स्थितीत शक्य नसल्याने जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी एकतर्फी आदेश काढणे आवश्यक असल्याची खात्री करून घेतली आहे.

जिल्हादंडाधिकारी रायगड यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन निर्बंध आदेश जारी केले आहेत.

## बांधकाम ठेकेदाराच्या खूनप्रकरणी कामगारास जन्मठेप

**माणगाव : प्रतिनिधी**

बांधकाम ठेकेदाराचा निर्घृण खून केल्याप्रकरणी आरोपी गवंडी कामगार जमिल मेहबुब शेख यास जन्मठेपेची शिक्षा व १,००० रुपयांचा दंड ठोठावण्याचा निर्णय माणगाव सत्र न्यायालयाने दिला आहे. या निर्णयामुळे तब्बल आठ वर्षांपूर्वी घडलेल्या खुनाच्या घटनेला न्याय मिळाला आहे.

सदर घटना ता. ५ एप्रिल २०१८ रोजी रात्री सुमारे ११.३० वाजता महाड शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मौजे सुंदरवाडी, ता. महाड येथील नवीन बांधकाम सुरू असलेल्या इमारतीत घडली होती. या घटनेत बांधकाम ठेकेदार अन्सार बहादूर बेग यांचा निर्घृण खून झाला होता.

या प्रकरणाची थोडक्यात पार्श्वभूमी अशी की, आरोपी जमिल मेहबुब शेख (वय ५०, रा. कवठळी, ता. परळी वैजनाथ, जि. बीड) हा मयत अन्सार बेग यांच्याकडे गवंडी म्हणून रोजंदारीवर काम करत होता. कामासाठी त्याने मयता कडून १३,००० रुपये आगाऊ रक्कम घेतली होती. आरोपीने गावाकडे जाण्याची इच्छा व्यक्त केली असता, आधी घेतलेल्या रकमेच्या बदल्यातील काम पूर्ण करूनच जाण्याचा आग्रह मयताने धरला. यावरून दोघांत वाद होऊन धक्काबुक्की व मारामारी झाली. या वादातून संतप्त झालेल्या आरोपीने जवळील मोठा दगड उचलून मयताच्या उजव्या कानाजवळ डोक्यात जोरदार मारून त्यांचा जागीच मृत्यू घडवून आणला.

या प्रकरणी आरोपीविरुद्ध भा.दं.वि. कलम ३०२ अन्वये महाड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक आर. पी. शिंदे यांनी करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. सदर खटल्याची सुनावणी अति. जिल्हा व सत्र न्यायालय, माणगाव-रायगड येथे झाली. सरकार पक्षाच्या वतीने अति. शासकीय अभियोक्ता जितेंद्र म्हात्रे यांनी प्रभावी युक्तिवाद केला.

## अभ्यास स्पीडमध्ये करा, मात्र गाडी हळू चालवा -जय शेट्ये

**कर्जत : प्रतिनिधी**



आता वाहनांची संख्या खूप वाढली आहे. अठरा वर्षा खालील विद्यार्थी दुचाकी चालवत असताना आपण पाहतो. त्यांच्याकडून काही अपघात झाल्यास त्याची शिक्षा पालकांना होऊ शकते. त्यामुळे सज्ञान झाल्यावर वाहन परवाना काढा आणि मगच गाडी चालवा. परवाना काढण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य आमच्याकडून मिळेल. मुलींनी परवाना काढतांना गियर असलेल्या गाडीचा काढल्यास भविष्यात त्यांना सोईचे होईल. कर्जत शहरातील वाहतूक समस्या बिकट आहे. त्याचा फटका मलासुद्धा बसला आहे. ही समस्या सोडविण्यासाठी सर्वांच्या साथीने प्रयत्न करू. आता जास्त स्पीडच्या नवनवीन गाड्या येत आहेत. विद्यार्थ्यांनो अभ्यास स्पीडने करा मात्र गाडी हळू चालवा.' असा महत्वापूर्ण सल्ला विभागीय परिवहन विभागाचे मोटार वाहन निरीक्षक जय शेट्ये यांनी विद्यार्थ्यांना दिला.

कोकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयातील सेमिनार हॉल मध्ये समर्थ मोटार ट्रेनिंग स्कूलच्या सहकार्याने रस्ता सुरक्षा जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. विभागीय परिवहन विभागाचे मोटार वाहन निरीक्षक जय शेट्ये यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयीन विकास समिती सदस्य विजय मांडे, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक कल्याणी सुराटकर, डॉ. निलोफर खान, डॉ. रुपाली येवले, समर्थ मोटार ट्रेनिंग स्कूलचे निलेश मराठे, अभिजीत मराठे आदी उपस्थित होते.

## नेरळमध्ये आधारभूत भात खरेदी केंद्र सुरू

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ विविध विकास कार्यकारी सहकारी सोसायटीच्या माध्यमातून नेरळ येथे आधारभूत भात खरेदी केंद्र हंगाम सुरू करण्यात आला. भाताची विक्री करण्यासाठी साडे पाचशे शेतकऱ्यांनी आपल्या नावाची नोंद केली असून भाताची खरेदी सुरू झाल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंद आहे.

महाराष्ट्र स्टेट को ऑपरेटिव्ह फेडरेशन लिमिटेड आणि जिल्हा पणन कार्यालय यांच्या वतीने आधारभूत भात खरेदी केंद्र यांना परवानगी देण्यात आली आहे. नेरळ विविध विकास कार्यकारी सोसायटी यांना हे आधारभूत भात खरेदी केंद्र यांच्या माध्यमातून भाताची खरेदी करण्यात आली आहे. नेरळ महसूल गोदाम येथे सोसायटीचे भात खरेदी केंद्र सुरू झाले. यावेळी नेरळ विविध कार्यकारी सोसायटीचे अध्यक्ष राजेंद्र विरले यांचे हस्ते विक्रीसाठी आलेल्या भाताच्या पोत्याचे पूजन करण्यात आले. त्यानंतर सोसायटीचे उपाध्यक्ष रवींद्र झांजे यांनी वजन काट्याचे पूजन केले तर संचालक शशिकांत मोहिते आणि यशवंत कराळे यांनी श्रीफळ वाढविला.

यावेळी शेतकरी शरद देशमुख, दिलीप शेळके आदी उपस्थित होते. नेरळ विविध कार्यकारी सोसायटी हद्दीत तब्बल साठ गावे असून या भागातील साडे पाचशे शेतकऱ्यांनी भाताची विक्री करण्यासाठी नोंदणी केली आहे. भाताची विक्री करण्यासाठी ३१ मार्च पर्यंत शेतकऱ्यांना मुभा देण्यात आली आहे.

## तळा येथे भटक्या कुत्र्यांच्या निर्बीजीकरणास सुरुवात

**तळा : प्रतिनिधी**



तळा शहरात भटक्या श्वानांचे निर्बीजीकरण करण्यात येत असल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. तळा शहरात मोठ्या प्रमाणात श्वानांचे प्रमाण वाढलेले आहे. तळा नगरपंचायतीने प्राणी जन्म नियंत्रण नियम २०२३ अन्वये, भटक्या श्वानांची संख्या नियंत्रणात आणण्याकरिता नगरपंचायत क्षेत्रातील भटक्या श्वानांना पकडून त्यांच्यावर निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करणे व त्यांना रेबीज प्रतिबंधक लस देण्याची कार्यवाही करण्यासाठी पेट्स फोर्स पुणे या संस्थेची नेमणूक केली आहे.

या संस्थेमार्फत सद्यस्थितीत ४५ भटक्या श्वानांना पकडूनत्यांच्यावर निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करून त्यांना रेबीज प्रतिबंधक लस देण्यात आली आहे. हा उपक्रम तळा नगरपंचायतीकडून दोन ते तीन टप्प्यांमध्ये करण्यात येणार असून त्याकरिता अर्थसंकल्पामध्ये तशी तरतूद करण्यात आलेली आहे. भटक्या श्वानांची संख्या नियंत्रणात येण्यासाठी हा उपक्रम राबवण्यात येत आहे. भटक्या श्वानांची

संख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली संख्या.आता नियंत्रणात आल्याने भटक्या श्वानांमुळे होणारा नागरिकांना त्रास कमी होणार असून, नागरिकांच्या मनामध्ये भटक्या श्वानांबद्दल असणारी भिती कमी होईल व श्वान हा माणसाचा शत्रू नसून तो माणसाचा मित्र व संरक्षक आहे, ही पूर्वीची भावना माणसाच्या मनात निर्माण होईल.व नाक्या नाक्यावरती बसलेले श्वानांची संख्या मोठी आहे.ही संख्या आता कमी होण्यास सुरुवात होणार आहे.

## डॉ. प्राजक्ता पाटील ठरल्या 'आरएमए सुंदरी'



**कर्जत : रामप्रहर वृत्त**

कर्जत येथे नुकत्याच झालेल्या रायगड मेडिकल असोसिएशन च्या वार्षिक अधिवेशनाचे प्रमुख आकर्षण असलेल्या मिसेस आर एम ए.-२०२६ सुंदरी चा बहुमान पनवेल च्या डेंटिस्ट डॉ प्राजक्ता पाटील यांनी पटकावला.

रायगड डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ आशुतोष कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली कल्चरल सेक्रेटरी डॉ सुप्रिया घोसाळकर, डॉ वर्षा मोरे, डॉ शर्वाणी कुलकर्णी, डॉ शीतल कराळे, डॉ जयश्री देशमुख आणि त्यांच्या टीमने कर्जत मधील क्राउन विला येथे उत्कृष्ट आयोजन केलेल्या ह्या सौंदर्य स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील अनेक महिला डॉक्टर सहभागी झाल्या होत्या. अध्यक्ष डॉ आशुतोष कुलकर्णी यांच्या सह रायगडचे सचिव डॉ प्रशांत गांगल आणि खजिनदार डॉ कुमार ओसवाल, रायकॉनचे मुख्य कार्यकारी अध्यक्ष डॉ गणेश साळुंखे आणि कार्यकारी अध्यक्ष डॉ श्रीपाल जैन यांच्या हस्ते विजेत्याना पुरस्कार देण्यात आले.

आरएमए सुंदरीचा बहुमान पनवेल च्या डेंटिस्ट डॉ प्राजक्ता पाटील यांनी पटकावला. दुसरा क्रमांक खोपोली च्या डॉ पल्लवी डोंबाले, तिसरा क्रमांक कर्जतच्या डॉ अमृता पाटील, चौथा क्रमांक खारघर च्या डॉ अंजू धार यांनी तर पाचवा क्रमांक खोपोली च्या डॉ रश्मी गांधी यांनी पटकावला. स्पर्धेच्या जज म्हणून मिस महाराष्ट्र पूजा बंदरकर, मिस महाराष्ट्र रनर अप डॉ आरती भोजने, अभिनेत्री ईशा सूर्यवंशी यांनी काम पाहिले.

## खालापूर तालुक्यात चार जि.प. गट आणि आठ पं.स. गणात निवडणूक

### आजपासून अर्ज स्वीकृती

**चौक : प्रतिनिधी**




खालापूर तालुक्यातील ४ जिल्हा परिषद गट व ८ पंचायत समिती गण साठी ११०९८२ मतदार मतदान करतील अशी माहिती शुक्रवार (दि.१६)पासून उमेदवारी अर्ज दाखल करता येतील अशी माहिती खालापूर तहसीलदार अभय चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत दिली.

खालापूर तालुक्यातील ४ जिल्हा परिषद व ८ पंचायत समिती निवडणुकीचा कार्यक्रम खालापूर तहसीलदार अभय चव्हाण यांनी पत्रकार परिषद घेऊन सादर केला. जिल्हा परिषद गट चौक,सावरोली, वासांबे व आत्कारगाव हे चार जिल्हा परिषद गट असून चौक हाळखुर्द, वासांबे, रीस, वाशिवली, सावरोली, खानाव व आत्कारगाव हे ८ पंचायत समिती गण आहेत. एकूण मतदार ११०९८२ असून पुरुष ५५६७६, तर स्त्री मतदार ५५३०३ आहेत.

वासांबे व सावरोली सर्वसाधारण असून आत्कारगाव सर्वसाधारण स्त्री आणि चौक अनुसूचित जमाती स्त्री साठी राखीव ठेवण्यात आले आहे. तर पंचायत समिती गण रीस, खानाव हे सर्वसाधारण,चौक अनुसूचित जमाती स्त्री, हाळखुर्द अनुसूचित जमाती, वासांबे नामाप्र. वाशिवली नामाप्र. स्त्री,सावरोली व आत्कारगाव सर्वसाधारण स्त्री राखीव असल्याचे सांगण्यात आले. चौक गटात ३६, वासंबे गटात ३६, सावरोली ३८ तर आत्कारगाव गटात ३४ अशी १४४ मतदान केंद्र असून सर्व केंद्र सुस्थितीत आहेत, असे सांगण्यात आले.

## मुरूड नगर परिषदेच्या स्वीकृत नगरसेवकपदासाठी दोन अर्ज सादर

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड नगरपरिषद निवडणूक नुकतीच झाली. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मधील थेट नगराध्यक्ष म्हणून आराधना मंगेश दांडेकर या निवडून आलेल्या आहेत. तर या पक्षाचे चार व उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे चार नगरसेवक निवडून आलेले आहेत. तर शिवसेनेचे १२ नगरसेवक निवडून आलेले आहेत.

मुरुड नगरपरिषदेत दोन स्वीकृत नगरसेवकांची निवड होणार आहे. यामध्ये शिवसेना पक्षास एक तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षास एक स्वीकृत नगरसेवक मिळणार आहे. शिवसेनेकडून मुरुड शहरात भंडारवाडा परिसरात राहणारे ॲड. रूपेश शंकर पाटील यांनी आपला अर्ज सादर केला आहे, तर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून प्रमुख नेते मनोज भगत यांनी अर्ज सादर केला आहे.

## रोहा अग्निशमन दलाचा अमित पाटील राज्यात पहिला

**धाटाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने राज्यातील महापालिका, नगरपालिका, नगरपंचायतीच्या कर्मचाऱ्यांना आग प्रतिबंध, अग्निशमन तंत्र, बचाव कार्य आणि आपत्कालीन व्यवस्थापनाचे शास्त्रोक्त प्रशिक्षण देण्यासाठी बेसिक फायर फाइटिंग ट्रेनिंग कोर्स आयोजित केला होता. रोह नगरपालिकेच्या अग्निशमन दलातील ड्रायव्हर कम ऑपरेटर अमित पाटील यांनी राज्यात प्रथम क्रमांक पटकावला



रोहा अष्टमी नगर पालिकेने कर्मचारी अमित पाटील, विकास मोरे, परेश सोलंकी, दर्शन कदम आणि ऋतिक शिंदे या पाच जणांना फायर फाइटिंग ट्रेनिंग कोर्स साठी पाठविले होते. यासाठी मुख्याधिकारी अजयकुमार एडके आणि आरोग्य अधिकारी मनोज पुळेकर यांनी पुढाकार घेतला होता.

नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी या परिक्षेत उज्वल यश प्राप्त करताना विशेष प्राविण्य मिळवले. नगरपालिकेच्या अग्निशमन दलातील ड्रायव्हर कम ऑपरेटर अमित पाटील यांनी २५० पैकी २१० गुण प्राप्त करत राज्यात प्रथम क्रमांक पटकावला. कर्मचाऱ्यांनी हा उपक्रम यशस्वीपणे पुर्ण केल्याने त्यांना नोकरीतील अनेक पर्याय खुले झाले आहेत. यासाठी त्यांनी मुख्याधिकारी अजयकुमार एडके आणि आरोग्य अधिकारी मनोज पुळेकर यांना धन्यवाद दिले.

## हलव्याच्या अनोख्या दागिन्यांची महिलांमध्ये क्रेझ

### पारंपरिक कलेला आधुनिकतेची जोड



**पाली : प्रतिनिधी**

मकर संक्रांतीचा सण म्हटला की तिळगुळाचा गोडवा आणि हलव्याच्या दागिन्यांची लगबग आलीच. सध्या बाजारपेठेत आणि महिला वर्गामध्ये हलव्याच्या दागिन्यांची मोठे आकर्षण (क्रेझ) पाहायला मिळत आहे. अनोख्या व आकर्षक डिझाईन्स आणि विविध किमतीत हे दागिने उपलब्ध असल्याने महिलांची खरेदीसाठी लगबग सुरू आहे.

खास मकर संक्रांतीला हलव्याच्या दागिन्यांना विशेष पसंती आणि मागणी असते. हे दागिने म्हणजे केवळ अलंकार नसून पारंपरिक हस्तकलेचे उत्तम उदाहरण आहे. हाताने किंवा मशीनने अतिशय कौशल्याने बनवलेले हे दागिने वजनाने अत्यंत हलके असतात, ज्यामुळे ते परिधान करणे सोपे जाते. सोन्या-चांदीच्या दागिन्यांच्या तुलनेत हे अत्यंत स्वस्त असल्याने सर्वसामान्यांच्या खिशालाही परवडणारे आहेत.

सध्या या दागिन्यांना खूप मागणी असून ऑनलाइन विक्री देखील जोरात सुरू आहे. सुबक डिझाईन्समुळे ग्रामीण भागासह शहरातूनही मोठी मागणी येत आहे. महाराष्ट्राची ही लोककला आजच्या आधुनिक फॅशनमध्येही आपली सांस्कृतिक ओळख टिकवून आहे, हेच या दागिन्यांच्या वाढत्या मागणीवरून दिसून येते.

सध्या बाजारपेठेत मंगळसूत्र, हार, बांगड्या, कानातले, नथ, बोरमाळ आणि पैंजण अशा विविध प्रकारात हे दागिने उपलब्ध आहेत. यामध्ये नैसर्गिक साहित्य

### फॅशन आणि फोटोशूटसाठी पहिली पसंती

**हलव्याचे दागिने हे फोटोशूट तसेच नवीन लग्न झालेल्या वधू वर यांची पहिली मकर संक्रांत आणि लहान मुलांच्या बोरन्हाण साठी हे दागिने वापरले जातात..लहान मुलांचे बोरन्हाणं हे जन्मल्यापासून ते वयाच्या पाच वर्षापर्यंत करतात.यांसारख्या कार्यक्रमांसाठीही हलव्याच्या दागिन्यांना मोठी मागणी आहे. हे दागिने 'ट्रेंडी' लूकसाठी लोकप्रिय झाले आहेत. पारंपरिक फोटोशूट या दागिन्यांना विशेष पसंती दिली जात आहे.**

साखर, लाख, रंग, काच आणि मण्यांचा कल्पक वापर केला जातो.लहान मुलांचे दागिने: ३०० रुपयांपासून ३००० रुपयांपर्यंत (मागणीनुसार).मोठ्यांचे दागिने: ९०० रुपयांपासून ४००० रुपयांपर्यंत आहेत

या दागिन्यांबाबत माहिती देताना अलिबाग येथील विक्रेत्या अंकिता कल्पेश पाटील यांनी सांगितले की, हे दागिने खाण्यायोग्य नसतात. यामध्ये प्लास्टिकच्या मण्यांवर साखरेचे कोटिंग केलेले असते. केवळ धागा आणि साखर वापरून बनवलेले काही विशिष्ट दागिनेच खाल्ले जाऊ शकतात. तसेच, साखरेचे कोटिंग असल्याने हे दागिने ओलावा किंवा हवेच्या संपर्कात आल्यास 'चीघळण्याची' शक्यता असते.

त्यामुळे ते हवाबंद डब्यात किंवा कोरड्या जागी ठेवणे आवश्यक आहे

**TENDER NOTICE**

**Shree Ganesh Co-op. Housing Society Ltd.,**
Plot No. 7, Sector-10, Khanda Colony, New Panvel (West), Navi Mumbai -410206
Invites sealed tenders from experienced Project Management Consultants (PMC) for redevelopment of the society building. (Plot area 4296.24 sq.m., 144 members).

**Eligibility:**
Minimum 7 years redevelopment experience in the field of Project Management Consultant (PMC).
Tender Cost: Rs. 20,000/- (Non-refundable) by DD in favour of Shree Ganesh Co-op. Housing Society Ltd.

**Tender Forms Available:**
16/01/2026 to 24/01/2026 (6:00 PM - 8:30 PM)
Last Date of Submission:
30/01/2026 (6:00PM-8:30 PM)
Society reserves right to accept or reject any/all tenders.
Contact: 8928787321/9029060100/7738532067

सही/- अध्यक्ष | सही/- सचिव | सही/- खजिनदार

**श्री गणेश सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित**
पत्ता :- पीएल ५ बी, बिल्डींग नं. १२ ते २०, भूखंड क्र. ०७, सेक्टर १०, खांदा कॉलनी, नविन पनवेल (प.), नवी मुंबई ४१०२०६.

# पनवेलमध्ये लोकशाहीचा उत्सव









**पनवेल : महापालिका निवडणुकीसाठी गुरुवारी शांततेत मतदान झाले. शहरातील गुजराती शाळेमध्ये झालेल्या मतदानावेळी आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्यासह बिनविरोध निवडून आलेल्या नगरसेविका दर्शना भोईर, प्रभाग १९चे उमेदवार राजू सोनी, सुमित झुंझारराव यांनी भेट देत मतदारांशी संवाद साधला. दरम्यान, रमाबाई धोंडीबा मुंडे (वय १०१) यांनी मतदानाचा हक्क बजावला.**

## वनमंत्री गणेश नाईक यांनी बजावला मतदानाचा हक्क

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका निवडणूक २०२६च्या मतदानाच्या दिवशी राज्याचे वनमंत्री नामदार गणेश नाईक यांनी कर्तव्यभावनेने कोपरखैरणे येथील सेंट मेरीज स्कूलमध्ये मतदानाचा हक्क बजावून लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवला.



माजी खासदार डॉ. संजीव नाईक यांनीदेखील याच ठिकाणी आपल्या मतदानाचा हक्क बजावला. माजी महापौर सागर नाईक यांनी कोपरखैरणे येथील सीबीएससी शाळेमध्ये मतदान केले. नागरिकांना मतदानाचे महत्त्व अधोरेखित करत, आपले मत ही आपली ताकद आहे. लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येक नागरिकाचे मतदान अत्यंत महत्त्वाचे असून एका मतातून शहराच्या विकासाची, सुरक्षिततेची आणि उज्ज्वल भविष्यातील दिशा ठरते, असा विश्वास व्यक्त केला.

लोकशाही ही केवळ अधिकार नव्हे तर कर्तव्य असल्याचे अधोरेखित करत, नागरिकांचा सक्रिय सहभाग हाच सक्षम शहराचा खरा पाया असल्याचे मत वनमंत्री गणेश नाईक यांनी व्यक्त केले. लोकशाहीच्या या उत्सवात मतदारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन त्यांनी केले.



**पनवेल : ९० वर्षीय आजीने मतदानाचा हक्क बजावला.**

## आवरे येथे बायोचार निर्मिती प्रशिक्षण; शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**उरण : बातमीदार**

शेतकऱ्यांनी शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जमिनीची सुपीकता टिकवून ठेवावी, या उद्देशाने उरण तालुक्यातील आवरे या गावामध्ये शेतकऱ्यांसाठी बायोचार (Biochar) निर्मिती आणि वापराबाबत विशेष प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणातून शेतकऱ्यांना टाकाऊ कचऱ्यापासून उपयुक्त खत कसे तयार करावे याचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाला कृषी विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती.

यामध्ये आर. टी. नारनवर (तालुका कृषी अधिकारी), एस. डी. गटकळ (मंडळ कृषी अधिकारी), धेंडे बी. वाय. (उप कृषी अधिकारी) व सर्व सहाय्यक कृषी अधिकारी उपस्थित होते. प्रशिक्षणामध्ये आवरे सजेचे सहाय्यक कृषी अधिकारी राठोड ए. आर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी बायोचार म्हणजे काय, याची सविस्तर माहिती दिली. पीक कापणीनंतर उरलेला कचरा न जाळता, त्यापासून शास्त्रीय पद्धतीने बायोचार तयार



केल्यास जमिनीला कर्ब (Carbon) मिळतो आणि पाण्याची धारण क्षमता वाढते, असे त्यांनी या वेळी स्पष्ट केले.

बायोचारचे फायदे या विषयी माहिती देण्यात आली. जमिनीचा पोत सुधारतो, सूक्ष्मजीवांची वाढ होते आणि रासायनिक खतांवरील खर्च कमी होतो. अशी माहिती देण्यात आली. शेतातील काडीकचरा, पिकांचे अवशेष यांचा वापर करून कमी ऑक्सिजनमध्ये ते जाळून कोळसा (बायोचार) तयार करण्याची प्रात्यक्षिके दाखवण्यात आले. हे खत पिकांना कशा प्रकारे द्यावे, याचे तांत्रिक नियोजन समजावून सांगितले.

या वेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन केले आणि जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेतीकडे वळण्याचे आवाहन केले.

## वेळीच सीपीआर मिळाल्यामुळे वाचले ४६ वर्षीय स्वयंसेवकाचे प्राण

**पनवेल, मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी रेल्वे स्टेशन परिसरात एक व्यक्ती मानसिक तणावाखाली विद्युत खांबावर चढल्याने अत्यंत धोकादायक परिस्थिती निर्माण झाली.

या व्यक्तीला सुरक्षितरित्या खाली आणण्यासाठी सुरू असलेल्या बचाव कारवाईदरम्यान अनपेक्षित घटना घडली असून याठिकाणी झालेल्या अपघातात बचावासाठी पुढाकार घेतलेल्या हेल्प फाउंडेशनचे स्वयंसेवक विजय भोसले यांना वीजेचा धक्का बसून जीभेला दुखापत झाली, धुरामुळे श्वसनमार्गाला इजा झाली, त्वचा भाजली तसेच मणक्याला व बरगड्यांना फ्रॅक्चर झाले व ते बेशुद्ध पडून त्यांचा श्वासोच्छ्वासही थांबला. त्यामुळे क्षणार्धात अत्यंत गंभीर परिस्थिती उद्भवली आणि घटनास्थळी तातडीच्या वैद्यकीय मदतीची गरज निर्माण झाली. वेळीच सीपीआर देत




रसायनी पोलीस स्टेशनजवळ जखमी झालेल्या हेल्प फाउंडेशनचे स्वयंसेवक विजय भोसले यांचे प्राण वाचविण्यात मेडिकव्हर हॉस्पिटल्सला यश मिळाले आहे.

या अपघातात बेशुद्ध पडलेल्या विजय भोसले यांचा श्वासोच्छ्वास थांबला असून यांनी या प्रसंगाचे गांभीर्य ओळखून हेल्प फाउंडेशनचे संस्थापक गुरुनाथ साठेलकर यांनी घटनास्थळी तात्काळ सीपीआर दिले, त्यामुळे श्री. भोसले यांचा त्यांचा श्वास पुन्हा पुर्ववत सुरू झाला. त्यानंतर त्यांना तातडीने मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले.

मेडिकव्हर हॉस्पिटल्सचे प्रादेशिक संचालक नीरज लाल यांनी या घटनेविषयी बोलताना सांगितले की, घटनास्थळी दिलेल्या सीपीआरमुळे रुग्णाचे प्राण वाचवणे शक्य झाले.

## खारघरमधून रिक्षाची चोरी

**पनवेल :** खारघर वसाहतीमध्ये उभी करून ठेवलेली रिक्षा अज्ञाताने चोरल्याची घटना घडली आहे. दीपक सुर्वे यांच्या मालकीची (एमएच ४६ सीवाय ०७१०) रिक्षा सेक्टर १२ खारघर हायटेक सोसायटीमध्ये उभी करून ठेवली असता ती चोरी झाली. याबाबतची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे आयएफआयए मिस्टर इंडिया स्पर्धेत सुयश

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील लेखा व वित्त विभागाचा तृतीय वर्षाचा विद्यार्थी महेंद्र जगदीश गौतम याने ११ जानेवारी रोजी नेरूळ येथे घेण्यात आलेल्या आयएफएआय सिझन दोन या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत ‘मिस्टर इंडिया (विजेता)’ हा मान पटकावला आहे व व्यवसाय व्यवस्थापन व शिक्षण विभागातील प्रथम वर्षाचा विद्यार्थी नरेंद्र पटेल याने आयएफआयए मिस्टर इंडिया २०२६ या राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित स्पर्धेत प्रथम उपविजेतेपद पटकावून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.



या उल्लेखनीय यशामागे त्यांची अथक मेहनत, आत्मविश्वास, शिस्त आणि अढळ निर्धार स्पष्टपणे दिसून येतो. देशभरातून सहभागी झालेल्या अनेक गुणवंत स्पर्धकांमध्ये त्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वाची, संयमाची आणि मानसिक सामर्थ्याची प्रभावी छाप पाडली. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे विद्यार्थी म्हणून त्यांनी हे सिद्ध केले आहे की यश केवळ शैक्षणिक प्रगतीपुरते मर्यादित नसून, धैर्य, कष्ट, शिस्त आणि आत्मविश्वास यांवरही अवलंबून असते त्यांची ही कामगिरी महाविद्यालयातील तसेच इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणारी आहे.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे, प्रा. डॉ. रीत ठुले व प्रा. डॉ. प्रवर शर्मा व इतर सर्व प्राध्यापक यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

## न्हावा शेवा सीएचए आधार सामाजिक संस्थेतर्फे आधार चषक

**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यात तसेच न्हावा शेवा बंदर परिसरात कस्टम हाऊस एजंट (सीएचए) चे काम करणारे मराठी तरुण वर्ग मोठ्या प्रमाणात असून यात स्थानिक भूमिपुत्र मोठ्या प्रमाणात काम करीत आहेत. या स्थानिक भूमिपुत्र मराठी तरुणांना न्याय मिळावा त्यांचे अधिकार व हक्क त्यांना मिळावेत अपघातग्रस्तांना मदत करता यावी यासाठी न्हावा शेवा सीएचए आधार सामाजिक संस्थेची स्थापना झाली.

आज पर्यंत अनेक सामाजिक कार्य या संस्थेच्या माध्यमातून करण्यात आली आहेत. आजपर्यंत अपघातग्रस्त व अपघातात मृत्यू पावलेल्या पूर्व विभागातील अनेक व्यक्तींना या संस्थेच्या माध्यमातून लाखो रुपयाची मदतही करण्यात आली आहे. उरण विभागात सतत होत असलेल्या अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुंबासाठी तसेच दुखापत झालेल्या सीएचए बांधवांसाठी अपघात ग्रस्त निधी संकलनासाठी त्याचप्रमाणे विविध सामाजिक कार्य करण्याच्या उद्देशाने रविवार, १८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ९ वाजता मी मराठी मैदान मोठी जुई, उरण येथे सीएचए आधार चषकाचे आयोजन करण्यात आले आहे.

दरवर्षी सीएचए आधार चषक या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले जाते व स्पर्धेतील मिळणारी रक्कम अपघातग्रस्तांसाठी व सामाजिक कार्यासाठी वापरली जाते अशा या सीएचए आधार चषकासाठी नागरिकांनी, रसिक प्रेक्षकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शवावी, असे आवाहन न्हावा शेवा सीएचए आधार सामाजिक संस्थेच्या वतीने करण्यात येत आहे.

## कोकण ज्ञानपीठ उरण महाविद्यालयात भूगोल दिन

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयात भूगोल विभागाच्या वतीने १४, जानेवारी हा भूगोल दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन भूगोल विभाग प्रमुख डॉ. आनंद गायकवाड यांनी केले.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. गर्जे उपस्थित होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी भूगोल विषयाचे महत्त्व विशद करताना, बदलत्या जागतिक परिस्थितीत भूगोलशास्त्राचे स्थान अत्यंत महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन केले. पर्यावरण, हवामान बदल, शहरीकरण व नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन यामध्ये भूगोलाची भूमिका अधोरेखित केली.

प्रमुख वक्त्या प्राध्यापिका डॉ. अनुपमा कांबळे यांनी विद्यार्थ्यांना भूगोल विषयातील करिअरच्या विविध संधींबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी GIS, रिमोट सेन्सिंग, पर्यावरणीय अभ्यास, आपत्ती व्यवस्थापन अशा आधुनिक शाखांची माहिती देऊन विद्यार्थ्यांना प्रेरित केले.

भूगोल विभाग प्रमुख डॉ. आनंद गायकवाड यांनी प्रास्ताविकातून भूगोल दिन साजरा करण्यामागील उद्देश स्पष्ट करताना, विद्यार्थ्यांमध्ये भौगोलिक जाणीव आणि पर्यावरणाबद्दलची जबाबदारी निर्माण करणे हे या कार्यक्रमाचे प्रमुख ध्येय असल्याचे सांगितले. सदर कार्यक्रमात ज्येष्ठ प्राध्यापक आर. टी. ठवरे आय क्यू.ए सी. समन्वयक डॉ. ए.आर. चव्हाण, इतिहास विभाग प्रमुख डॉ. एम.जी. लोणे, डॉ. डी पी हिंगमिरे आणि बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते. आभार डॉ. अनुपमा कांबळे यांनी मानले.

## राज्यस्तरीय शास्त्रीय ख्याल गायन स्पर्धेची अंतिम फेरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल कल्चरल सेंटरतर्फे आयोजित करण्यात आलेल्या तिसाव्या राज्यस्तरीय शास्त्रीय ख्याल गायन स्पर्धेची अंतिम फेरी नुकतीच रविवारी (दि.११) संस्थेच्या सभागृहात पार पडली. या स्पर्धेत राज्यभरातून एकूण २४ स्पर्धकांनी भाग घेतला होता. नंदकुमार कर्वे, मिलिंद गोखले आणि मधुरा सोहनी यांनी या गायनाचे परीक्षण करून त्यातून ११ स्पर्धकांची निवड अंतिम फेरीसाठी केली होती.




अंतिम फेरीच्या स्पर्धेचे परीक्षण डॉ. राम नेने आणि डॉ. अनया थत्ते यांनी केले. स्पर्धेनंतर स्पर्धकांना मार्गदर्शन करताना डॉ. राम नेने म्हणाले, गाणं सादर करताना तुम्ही इतरांपेक्षा काय वेगळं गाता हे महत्त्वाचे आहे आणि तेच श्रोत्यांना आकर्षित करतं.

डॉ. अनया थत्ते म्हणाल्या, श्रोत्यांसाठी जेव्हा आपण गायन करतो तेव्हा श्रोत्यांच्या अपेक्षाही पूर्ण करण्याच्या जबाबदारीने गायन करायला हवं आणि स्पर्धेसाठी जर गायन करत असाल तर इतरांपेक्षा आपलं काहीतरी वेगळं गायनात असलं पाहिजे.

पनवेल कल्चरल सेंटरच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष मिलिंद गोखले यांनी मान्यवर परीक्षकांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केल्यावर स्पर्धेतील विजेत्यांना परीक्षकांच्या हस्ते रोख रक्कम, स्मृतिचिन्हे, प्रमाणपत्र आणि सुरेश राव यांनी संपादित केलेल्या सलिल चौधरी यांच्यावरील पुस्तकाचा समावेश असलेली पारितोषिके देण्यात आली. दहा हजार रुपयांचे शैलजा तळेकर स्मृती प्रथम पारितोषिक स्नेहल पाटील हिने पटकावले तर सात हजार रुपयांचे शुभदा मधुकर दशपुत्रे स्मृती द्वितीय पारितोषिक सिद्धार्थ गोडांबे यास मिळाले.

पाच हजार रुपयांचे प्रभाकर आघारकर स्मृती तृतीय पारितोषिक निरंजन पेडगावकर यास तर चार हजार रुपयांचे विश्वास भिडे स्मृती उत्तेजनार्थ पारितोषिक मृण्मयी भिडे हिला देण्यात आले. याशिवाय या स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी निवड झालेला सर्वात लहान स्पर्धक म्हणून अंशुल बोपर्डीकर याला तीन हजार रुपयांचे गोपाळकृष्ण राव स्मृती पारितोषिक देण्यात आले. मधुरा सोहनी यांनी स्पर्धा समिती प्रमुख म्हणून उत्तम नियोजन केले आणि त्यांना श्रीधर सप्रे, नंदकुमार कर्वे, चंद्रकांत मने, अजय भाटवडेकर, शशिकांत पाटील प्रभृतींची उत्तम साथ लाभली.



**पनवेल : सिडको प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी साडेबारा टक्के योजनेचे प्रणेते, माजी खासदार, लोकनेते दि.बा. पाटील यांच्या जन्म शताब्दीनिमित्त स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष व प्रकल्पग्रस्त रिक्षा चालक मालक संघटना टपाल नाका पनवेल यांच्या वतीने ‘दिबां’ना आदरांजली वाहिली. या वेळी नरेश परदेशी, दिलीप नाईक आणि प्रकल्पग्रस्त रिक्षा चालक-मालक संघटनेचे सर्व सभासद उपस्थित होते.**

## आवरे महाविद्यालयात राष्ट्रीय युवा दिन

**उरण : रामप्रहर वृत्त**

आवरे येथील ज्ञान प्रसारक शिक्षण संस्थेच्या शिक्षकमित्र बाळासाहेब म्हात्रे कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स, अँड कॉमर्स महाविद्यालयात सोमवारी राजमाता जिजाऊ यांची जयंती व स्वामी विवेकानंद यांचा जन्मदिवस राष्ट्रीय युवक दिन या स्वरूपात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांचे गुणसंपन्न व्यक्तिमत्व घडविण्याचे कार्य करणाऱ्या राजमाता जिजाऊ व अध्यात्म, राष्ट्रभक्ती व मानव सेवा हीच ईश्वर सेवा असा मौलिक संदेश देणाऱ्या स्वामी विवेकानंद यांच्या जीवन कार्याचा आढावा उपासना गावंड व शेखर म्हात्रे या विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून घेतला, तर प्रा. शरद केणी व अॅड. वृषाली पाटील यांनी अमली पदार्थमुक्त भारत तसेच राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या अनेक पैलूंवर भाष्य केले.

प्राचार्य सुविद्य गावंड व प्राचार्य सुभाष ठाकूर यांनी युवकांना शुभेच्छा दिल्या. इशस्तवन व स्वागतगीत नंदलाल पाटील व मृणाल म्हात्रे यांनी सादर केले. एस.आर. गावंड यांनी सूत्रसंचालन, तर प्रवीण चिर्लेकर यांनी आभार मानले.

# जि.प.,पं.स. निवडणुकीसाठी विविध निर्बंध

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक-२०२६ च्या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रचारादरम्यान होणारे ध्वनीप्रदूषण रोखण्यासाठी जिल्हादंडाधिकारी किशन जावळे यांनी ध्वनीक्षेपकाच्या वापरावर कडक निर्बंध घालणारे आदेश जारी केले आहेत. यासोबतच निवडणूक प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय्य वातावरणात पार पाडण्यासाठी रायगड जिल्ह्यात जात, धर्म किंवा भाषावार शिबिरे व मेळावे आयोजित करण्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत. तर राजकीय पक्ष, उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींनी वापरणाऱ्या वाहनांच्या ताफ्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत. रायगड जिल्ह्यात कोणत्याही राजकीय पक्ष किंवा उमेदवाराच्या वाहनांच्या ताफ्यात दहापेक्षा अधिक मोटारगाड्या किंवा वाहने वापरण्यास बंदी घालणारे आदेश जारी केले आहेत. हे आदेश आदर्श आचारसंहिता लागू असलेल्या कालावधीत, निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अंमलात राहणार आहेत.

निवडणूक प्रचाराच्या कालावधीत वाहनांवरून मोठ्या आवाजात ध्वनीक्षेपक वापरल्याने ध्वनीप्रदूषण होऊन नागरिकांच्या शांततेस व आरोग्यास बाधा पोहचण्याची शक्यता लक्षात घेऊन हे निर्बंध घालण्यात आले आहेत. मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३३ (एन) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करत जिल्हादंडाधिकाऱ्यांनी खालीलप्रमाणे आदेश दिले आहेत. ध्वनीक्षेपकाचा वापर संबंधित पोलीस अधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगी शिवाय करता येणार नाही. सकाळी ६.०० वाजण्यापूर्वी व रात्री १०.०० वाजेनंतर कोणत्याही ठिकाणी किंवा फिरत्या वाहनावर ध्वनीक्षेपक वापरण्यास मनाई असेल. दिवसा प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांनी ध्वनीक्षेपकाचा वापर विशिष्ट ठिकाणी ठिकाणी थांबूनच करावा.

ध्वनीक्षेपकाच्या आवाजासह फिरणाऱ्या वाहनास बंदी असेल. सर्व राजकीय पक्ष, उमेदवार आणि इतर व्यक्तींनी निश्चित ठिकाणी ध्वनीक्षेपकाच्या वापरासंबंधीत घेतलेल्या परवानगीची माहिती जिल्हाधिकारी, संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी व संबंधित यंत्रणेला कळविणे बंधनकारक असेल.

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करीत जिल्हादंडाधिकाऱ्यांनी जिल्ह्यात कुठेही कोणत्याही प्रकारची जातीय, धार्मिक किंवा भाषावार शिबिरे, मेळावे व तत्सम कार्यक्रम आयोजित करण्यास (आचारसंहितेच्या कालावधीत) निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत बंदी घातली आहे. हे आदेश प्रत्येक व्यक्तीपर्यंत स्वतंत्रपणे पोहचविणे शक्य नसल्याने पोलीस विभागामार्फत ध्वनीक्षेपकाद्वारे या आदेशांची जाहीर घोषणा व प्रसिध्दी करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. आदेशांचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

जिल्हादंडाधिकाऱ्यांनी रायगड जिल्ह्यात आचारसंहिता लागू असलेल्या कालावधीत, निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कोणत्याही राजकीय पक्षांनी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी दहापेक्षा अधिक मोटारगाड्या किंवा वाहनांचा ताफा वापरण्यास मनाई केली आहे.

**प्रशासनाकडून कारवाईचा इशारा**

**हे आदेश प्रत्येक व्यक्तीपर्यंत स्वतंत्रपणे पोहोचविणे शक्य नसल्याने पोलीस विभागामार्फत ध्वनीक्षेपकाद्वारे या आदेशांची जाहीर घोषणा व प्रसिद्धी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आदेशांचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही जिल्हा प्रशासनाने दिला आहे.**

# 'सुंदर कोकण'साठी ग्रामस्थ एकवटले

◆ माणगाव-म्हसळा रोडवरील झाडांचे संरक्षण
◆ मोर्बे, डोंगरोली, साई ग्रामपंचायतींचा उपक्रम

**माणगाव : प्रतिनिधी**



कोकणच्या निसर्गसौंदर्याचे जतन व्हावे, हिरवळ टिकून राहावी आणि सुंदर कोकण ही ओळख अधिक बळकट व्हावी, या उद्देशाने मंगळवार, १३ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८ ते ९ या वेळेत माणगाव-म्हसळा रोडच्या दुतर्फा राबविण्यात आलेला वृक्षसंरक्षण व स्वच्छता उपक्रम नागरिकांच्या संवेदनशीलतेचे दर्शन घडवणारा ठरला.

या रस्त्याच्या कडेला यापूर्वी लावलेली अनेक झाडे कालांतराने तुटली होती, मात्र शासनामार्फत दोन्ही बाजूंनी नव्याने लावण्यात आलेली झाडे सध्या उत्तमरीत्या वाढत आहेत. असे असतानाही मोर्बे व डोंगरोली परिसरात दरवर्षी उन्हाळ्यात लागणाऱ्या वणव्यांमुळे ही झाडे जळून जाण्याचा धोका कायम असल्याने, या भूमीसाठी काहीतरी केले पाहिजे, या जाणीवेतून मोर्बे, डोंगरोली आणि साई या ग्रामपंचायती पुढे आल्या. या उपक्रमाचे नेतृत्व कोकणचे सुपुत्र, पर्यावरणप्रेमी आणि संवेदनशील व्यक्तिमत्त्व असलेले मोर्बे ग्रामपंचायतीचे सरपंच शौकत रोहेकर यांनी केले. त्यांना या भूमीवर नितांत प्रेम असलेले उपसरपंच राजू मोरे, ग्रामसेवक करडे, ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी आणि ग्रामस्थांची भक्कम साथ लाभली. तसेच साई ग्रामपंचायतीचे उपसरपंच विठोबा मोरे यांच्यासह प्रवीण अधिकारी, रविंद्र अधिकारी, धनाजी येलवे, गफार सोलकर, तर डोंगरोली ग्रामपंचायतीचे सरपंच विष्णू कालप व गावातील महिलांनीही प्रत्यक्ष श्रमदान करून झाडांभोवतालची साफसफाई मोठ्या प्रमाणात केली.

उर्वरित झाडांच्या संगोपनासाठी दानशूर व कोकणावर प्रेम करणारे अल्ताफ धनसे, अब्दुला महंमद शरीफ हर्णेकर (मोर्बे), सैफुल्ला जळगावकर (साई) तसेच मोर्बे-साई-डोंगरोली परिसरातील नागरिकांनी सहकार्य करण्याची तयारी दर्शवली आहे. माणगाव ते साई या मार्गावर लावलेली झाडे सामाजिक माध्यमे, लोकसहभाग आणि सततच्या देखरेखीच्या माध्यमातून नक्कीच जगवली जातील, असा विश्वास सरपंच, उपसरपंच आणि ग्रामस्थांनी व्यक्त केला.

या वेळी वनविभागाचे शिंदे, मोरे, सुभेदार, पिंगळा व इतर कर्मचाऱ्यांनी ग्रामस्थांचे आभार मानत, ही वाढलेली झाडे तुमच्या गावाची संपत्ती आहेत. याशिवाय राजस्थानमधून येऊन या भूमीवर प्रेम करणारे व्यापारी अर्जुन भाटी (रजपूत) यांनीही या उपक्रमासाठी मोलाची मदत करून पर्यावरणासाठी एकतेचा संदेश दिला.

# मोरे महिला महाविद्यालयात राष्ट्रीय भूगोल दिनानिमित्त प्रतिभा शोध स्पर्धा

**रोहा : प्रतिनिधी**

प्रख्यात भारतीय शास्त्रज्ञ चंद्रशेखर धुंडीराज देशपांडे यांचा जन्मदिन हा 'राष्ट्रीय भूगोल दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिनानिमित्त एम बी मोरे महिला महाविद्यालयाच्या भूगोल विभागाने बुधवारी (दि.१४) रोजी राष्ट्रीय भूगोल दिनानिमित्त प्रतिभा शोध स्पर्धा :वसुंधरा वेध चे आयोजन केले.

ही स्पर्धा माध्यमिक, उच्च माध्यमिक, पदवी, पदव्युतस्तर घेण्यात आली. रोहा तालुक्यातील महाविद्यालयांमधून चार स्तरांमध्ये एकूण ५२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेत माध्यमिक स्तर प्रथम क्रमांक बराटे अंश आनंद, दहिगुडे अवधूत हनुमंत(जे. एम.राठी इंग्लिश मीडियम स्कूल, द्वितीय क्रमांक खांडेकर सोनाक्षी गणेश, सिद्दिकी फिजा इस्तियाक (एम.बी.मोरे कॉलेज), तृतीय क्रमांक कंक सानिका अशोक, जाधव शरयू (एम.बी पाटील इंग्लिश मीडियम स्कूल), प्रोत्साहनपर बक्षीस जाधव स्वरा सचिन, गोविलकर प्रणिता प्रशांत (के. ई. एस इंग्लिश स्कूल), उच्च माध्यमिक स्तर प्रथम क्रमांक पेटकर अनुष्का प्रसाद (एम.बी.मोरे जूनियर, कॉलेज), द्वितीय क्रमांक बोंगु श्रीशा जगाराव (एम.बी.मोरे ज्युनिअर कॉलज), तृतीय क्रमांक पवार पूजा दिलीप (शासकीय आश्रम शाळा सानेगाव), पदवी स्तर प्रथम क्रमांक कु गिरप गायत्री सत्यवान(एम. बी.मोरे महिला महाविद्यालय), द्वितीय क्रमांक कु चौरासिया पूजा (एम. बी.मोरे महिला महाविद्यालय), तृतीय क्रमांक कोंडे समृद्धी संजय (एम. बी.मोरे महिला महाविद्यालय) यांनी पटकावला आहे.

संस्थेचे संचालक अशोक मोरे यांच्या हस्ते प्रमाणपत्र आणि भेटवस्तू देऊन विजेत्यांना गौरविण्यात आले. स्पर्धेचे आयोजन महाविद्यालयाच्या भूगोल विभाग प्रमुख प्रा.दर्शना शिंदे, सहकारी प्रा. ऋतुजा पवार, प्रा.अक्षता ठाकूर, प्रा.बराटे योगिता यांनी यशस्वीपणे पूर्ण केले.



# माणगावात नेत्र शिबिरात ९१ जणांची तपासणी



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहरात शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व माणगाव तालुक्यातील उद्योजक विजय मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगावतर्फे बुधवारी (दि.१४) मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन महेंद्र मेथा यांच्या प्रशस्त जागेत हॉलमध्ये जुने एसटी स्टॅन्डजवळ माणगाव या ठिकाणी करण्यात आले होते.

या शिबिरात शंकरा आय हॉस्पिटलचे नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. प्रकाश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी नवीन ९१ रुग्णांची तपासणी करून ४५ नेत्ररुग्णांना पनवेल येथे नेऊन त्यांच्यावर मोफत यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. हे शिबिर दर महिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या बुधवारी आयोजित केले जाते. माणगावात गेली तीन वर्षांहुन अधिक काळात ४३ वेळा शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व माणगाव येथील प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट यांच्यातर्फे मोफत नेत्ररोग व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

शिबिरासाठी विजयशेठ मेथा, सुप्रिया शिंदे, तनुजा मेथा, छाया मेथा, विधिता मेथा, मनीष मेथा यांच्यासह शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेलचे डॉ.प्रकाश पाटील, डॉ.श्रुती मोहन, सोनाली उतेकर, नंदिनी देवदूतकर, सागर पाटील, गुरुनाथ घुटे यांनी सहकार्य करीत विशेष परिश्रम घेतले.

# राजदर्पण संस्थेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

**पोलादपूर : प्रतिनिधी**

राजदर्पण सेवाभावी संस्थेच्या वतीने राजदर्पण दिनदर्शिका २०२६चे प्रकाशन अत्यंत उत्साहात पार पडले.

छत्रपती श्री शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळ्यालगत पोलादपूर येथे आद्यपत्रकार स्व. बाळशास्त्री जांभेकर दर्पण पत्रकारिता पुरस्कार प्राप्त जेष्ठ पत्रकार शैलेश पालकर यांच्याहस्ते व प्रमुख उपस्थितीत नगरपंचायत पोलादपूरचे माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक नागेश पवार यांच्या वाढदिवसानिमित्त दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले.

या वेळी संस्थेचे अध्यक्ष दर्पणदादा दरेकर, सचिव ओंकार मोहिरे, विश्वस्त मुश्ताक मुजावर, गणेश कासुर्डे, अवधूत मोहिरे यांच्यासह प्रवीण पांडे, आदेश गायकवाड, अखिलेश शिंदे, आदित्य गायकवाड, अथर्व शिंदे, सनी विचारे, प्रतीक सुर्वे, महेश निकम, अभिजित साळुंखे नईम धामणकर, नासिरभाई मजगणकर, असिफ चाफेकर, इतर सदस्य उपस्थित होते.



# मोफत चष्मे वाटप, गरजूंची नेत्र ऑपरेशन सेवा

**रेवदंडा : प्रतिनिधी**

श्री साई नेत्रालयाचे वतीने २३ डिसेंबर २०२५ रोजी आयोजीत नेत्र तपासणी शिबीरातील गरजूना मोफत चष्मे वाटप व नेत्र ऑपरेशन सेवा देण्यात आली. अलिबाग तालुक्यातील खारगल्ली, धोबन तलावा समोरील प्रशांती निवास येथे श्री साईसेवक सुरेश मेहेर यांचे मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला.

या मोफत चष्मे वाटप कार्यक्रमांस नागाव ग्रामपंचायतीच्या सरपंच हर्षदा मयेकर व माजी सरपंच नंदुशेठ मयेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी श्री साई नेत्रालयाचे वतीने २३ डिसेंबर २०२५ रोजी करण्यात आलेल्या नेत्र तपासणी मधील गरजूना मोफत चष्मे वाटप करण्यात आले, यावेळी एकूण ३४ लाभार्थींचा मोफत चष्मे वाटप करण्यात



आले. या वेळी श्री साई सेवक सुरेश मेहेर यांचेसह शिवरामभाई पटेल, नरेशभाई पटेल यांची उपस्थिती होती. शिवाय २३ डिसेंबर २०२५ रोजी करण्यात आलेल्या नेत्र तपासणी मधील २० गरजूची नेत्र ऑपरेशन लायन्स क्लब चोंढी यांचे सहकार्याने करण्यात आले.

खारगल्ली साईनगर प्रशांती निवास येथील श्री साई नेत्रालयाचे वतीने ओ.पि.डी. युनिट व्दारे प्रत्येक महिन्याचा २३ तारखेला नेत्र तपासणी संबधीत सर्व उपचार, तसेच मोती बिंदू/काच बिंदू, चे मोफत ऑपरेशन सुध्दा कसलेही शुल्क न आकारता करण्यात येणार आहे. मात्र यासाठी आधार कार्ड, रेशन कार्ड झेरॉक्स प्रत आवश्यक आहे, अशी माहिती सत्यसाई सेवक सुरेश मेहरे यांनी दिली. तसेच गरजूनी अधिक माहितीसाठी ९८५०२१७६४८, ७०२०७७२७६४, ७७४१०९३०५९, ९०७५५२३५३७ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन सत्यसाई सेवक सुरेश मेहरे यांनी कळविले आहे.

दरम्यान, नागाव ग्रा.प.सरपंच हर्षदा मयेकर यांचे हस्ते श्री साई नेत्रालयाचे वतीने लाभार्थीना मोफत चष्मे वाटप कार्यक्रम पार पडला.

# द.ग. तटकरे महाविद्यालयास 'सेंटर ऑफ एक्सलन्स'

## करिअर कट्टा उपक्रमांतर्गत मानांकन

**माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग तसेच महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने बारामती येथील आप्पासाहेब पवार सभागृहात बुधवार, ७ जानेवारी २०२६ रोजी आयोजित विद्यार्थी संसदीय अधिवेशनात माणगाव येथील दग तटकरे महाविद्यालयाला करिअर कट्टा उपक्रमांतर्गत 'सेंटर ऑफ एक्सलन्स' म्हणून गौरविण्यात आले.



या मान्यवर सन्मानाचा स्वीकार महाविद्यालयाचे करिअर कट्टा समन्वयक व मुंबई विभागीय सहसमन्वयक डॉ. बबन सिंगारे यांनी केला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर तसेच महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे यांच्या हस्ते हा सन्मान प्रदान करण्यात आला.

महाविद्यालयाच्या करिअर कट्टा उपक्रमांतर्गत विविध क्लबसची स्थापना करण्यात आली असून, दररोज विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन माध्यमातून एमपीएससी, यूपीएससी व अन्य स्पर्धा परीक्षा, तसेच स्वयंरोजगार व उद्योजकता विकास यासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन दिले जाते. याच कालावधीत बारामती येथे आयोजित करण्यात आलेल्या पाच दिवसीय करिअर संसद अधिवेशनात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

या यशाबद्दल करिअर कट्टा विभागाचे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे, संस्थेचे सचिव आदरणीय कृष्णाभाई गांधी, प्राचार्य डॉ. बी. एम. खामकर, उपप्राचार्य डॉ. राजेंद्र आचार्य, डॉ. पांडे, ग्रंथपाल डॉ. संगीता उत्तेकर, सर्व प्राध्यापकवृंद, संचालक मंडळ तसेच कर्मचारीवर्ग यांनी अभिनंदन केले आहे.

# राष्ट्रवादी रोहा शहर उपाध्यक्षपदी भालचंद्र पवार

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज नगर येथील तरुण कार्यकर्ते भालचंद्र सुरेश पवार यांची राष्ट्रवादी (अजित पवार गट) पक्षाचे शहर उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली असून मंत्री अदिती तटकरे यांच्या हस्ते शहर अध्यक्ष अमित उकडे यांच्या सहीचे नियुक्तीचे पत्र भालचंद्र सुरेश पवार यांना प्रदान करण्यात आले.

या वेळी तालुका कार्याध्यक्ष समीर शेडगे, शहर अध्यक्ष अमित उकडे, गटनेते महेंद्र गुजर, नगरसेवक राजेंद्र जैन, मयूर दिवेकर, अजित मोरे, स्वप्नील धनावडे, प्रेषित बारटक्के व अन्य पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

नियुक्ती झाल्याबद्दल पवार यांचे माजी आमदार अनिकेत तटकरे, नगराध्यक्षा वनश्री शेडगे उपनगराध्यक्ष अहमद दर्जी आदींनी अभिनंदन केले.



# रस्ते सुरक्षेबाबत जागरूकता अभियानात २४००हून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

होंडा मोटरसायकल अँड स्कूटर इंडिया यांनी महाराष्ट्रातील अलिबाग येथे जागरूकता अभियानाच्या माध्यमातून आपला देशव्यापी रस्ता सुरक्षा उपक्रम राबविला. या अभियानात एस. एम. वाडके हायस्कूल, बाबासाहेब नजरे हायस्कूल आणि सरदार राव बहादूर तेंडुलकर विद्यालयातील २४००हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.



या उपक्रमातून रस्त्यावरील सुरक्षिततेविषयी शिक्षण, संवाद आणि सामायिक जबाबदारी यासाठी एक खुले व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले. या सत्रांमधून रस्ता सुरक्षा ही केवळ नियमांची अंमलबजावणी नसून ती एक दैनंदिन सवय आहे, जी वैयक्तिक तसेच सामूहिक कल्याणावर परिणाम करते, अशी जाणीव सहभागी विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्यात आली. या कार्यक्रमात संवादात्मक शिकण्यावर भर देण्यात आला, ज्यामुळे सहभागी विद्यार्थी रस्ता सुरक्षा संकल्पनांशी सक्रियपणे जोडले गेले. सुरक्षित वाहनचालक सिद्धांत सत्रे ही या मोहिमेची पायाभूत रचना ठरली असून, त्याद्वारे महत्त्वाचे संदेश सहज आणि परिणामकारक पद्धतीने पोहोचविण्यात आले. या प्रदेशात दैनंदिन वाहतुकीत दुचाकी वाहनांचा मोठा वाटा असल्याने, विद्यमान तसेच भावी वाहनचालकांमध्ये माहितीपूर्ण व जबाबदार वर्तनाला प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

मोहिमेदरम्यान दैनंदिन जीवनात वारंवार उद्भवणाऱ्या प्रत्यक्ष परिस्थितींवर चर्चा करण्यात आली. जागतिक सुरक्षा घोषवाक्य 'Safety for Everyone'च्या मार्गदर्शनाखाली, होंडा (HMSI) मोबिलिटी आणि सुरक्षा यांचा समन्वय साधणारे भविष्य घडवण्यास कटिबद्ध आहे.

# कर्जत येथे रायगड मेडिकल असोसिएशनचे वार्षिक अधिवेशन

**कर्जत : रामप्रहर वृत्त**



रायकॉन २०२६ हे दोन दिवसीय अधिवेशन डॉ.आशुतोष कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली साल्ट ओलेंडर फार्म येथे मोठ्या उत्साहात झाले. उद्घाटनावेळी कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे आणि प्रख्यात इतिहास संशोधक प्रा.डॉ. कुरुष दलाल उपस्थित होते. संपूर्ण रायगड जिल्ह्यातील ७०० डॉक्टर्स उपस्थित होते.

या अधिवेशनाची जबाबदारी अध्यक्ष डॉ. आशुतोष कुलकर्णी यांच्यासह रायगडचे सचिव डॉ. प्रशांत गांगल आणि खजिनदार डॉ.कुमार ओसवाल आणि त्यांचे कर्जत मेडिकल असोसिएशनचे सर्व पदाधिकारी आणि सभासद यांनी यांनी उचलली होती, या वेळी संपादक डॉ. दिलीप सावळे यांनी संपादन केलेल्या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.

अधिवेशनामध्ये रायकॉन २६चे प्रमुख सल्लागार डॉ प्रेमचंद जैन, साइंटिफिक चेयरमैन डॉ गंगोलिया, कर्जत मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ आशिष कर्वे, डॉ साबणे, माजी अध्यक्ष डॉ फडके, चीफ ऑर्गनायझिंग चेयरमैन डॉ.गणेश साळुंखे, ऑर्गनायझिंग चेयरमैन डॉ.श्रीपाल जैन आणि डॉ. गजानन चव्हाण, डॉ.महेश शिरसाट, डॉ.भावेश ओसवाल, डॉ.आदित्य जंगम, डॉ.प्रतीक कांबळी, डॉ.राहुल पाटील आदींनी परिश्रम घेतले. संस्थेचे सुकाणू समिती डॉ. लाड, डॉ. डहाके, डॉ. काळे यांचेही मार्गदर्शन लाभले.

महाराष्ट्र बालरोग संस्थेचे अध्यक्ष डॉ. विनायक पाटील, रायगड चे माजी अध्यक्ष डॉ. प्रमोद गांधी, डॉ रमेश पटेल, डॉ.आदेश पाथरे, डॉ. राज कल्याणी, डॉ. राजेंद्र चांदोरकर आणि अनेक मान्यवर या वेळी उपस्थित होते. उद्घाटन सोहळ्याचे सूत्रसंचालन डॉ. शर्वाणी कुलकर्णी, डॉ. कुणाल राठोड यांनी केले. संपूर्ण अधिवेशनाची सूत्रसंचालन करण्याची जबाबदारी डॉ. अनिरुद्ध जोशी यांनी पार पाडली. त्यांना डॉ.साजिद अधिकारी, डॉ. कामिनी मसुल, डॉ. जयश्री देशमुख, डॉ.शीतल कराळे, डॉ.अमृता पाटील, डॉ. मनीष परमार यांनी सहकार्य केले.

# दिल्लीचा अखेरच्या चेंडूवर विजय

## यूपी वॉरियर्सच्या पराभवाची हॅट्ट्रिक



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

दिल्ली कॅपिटल्स संघाने अखेरच्या चेंडूवर यूपी वॉरियर्ज संघावर सात विकेट्सने रोमांचक विजय मिळवला. यासह कर्णधार जेमिमा रॉड्रीग्जच्या नेतृत्वाखाली दिल्लीने स्पर्धेतील पहिला विजय नोंदवला, तर यूपी संघाचा हा सलग तिसरा पराभव ठरला. .

गुजरात जायंट्सविरूद्ध आधीच्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सचा संघ अखेरच्या षटकात सहा धावा करण्यात अपयशी ठरला होता. यावेळेस यूपी वॉरियर्सविरूद्धदेखील सारखेच चित्र होते. दिल्लीला अखेरच्या षटकात विजयासाठी सहा चेंडूत सहा धावांची गरज होती. फिरकीपटू सोफी एकलस्टन गोलंदाजी करत होती. पहिला चेंडी डॉट बॉल राहिला. त्यानंतर मारिजन कापने दुसऱ्या चेंडूवर चौकार खेचला. तिसरा, चौथा दोन्ही चेंडू डॉट बॉल राहिले. पाचव्या चेंडूवर कापने एक धाव घेतली आणि अखेरच्या चेंडूवर एका धावेची गरज असताना लॉरा वोल्व्हार्डने चौकार लगावत संघाला अखेरीस पहिला विजय मिळवून दिला.

यूपी वॉरियर्जने दिलेल्या १५५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्लीची सुरुवात दणक्यात झाली. दिल्लीकडून शफाली वर्मा व लिझेल ली यांनी पहिल्या विकेटसाठी ९४ धावांची भागीदारी रचली. शफाली ३२ चेंडूत सहा चौकारांसह ३६ धावा करत, तर ली ४४ चेंडूत आठ चौकार व तीन षटकारांसह ६७ धावा करून बाद झाली. त्यानंतर लॉरा वोल्व्हार्ड व जेमिमा रॉड्रीग्ज यांनी संघाचा डाव पुढे नेला, पण जेमिमाने पुन्हा एकदा गुजरात जायंट्सविरूद्ध सामन्यातील विकेटप्रमाणे आपली विकेट गमावली. दिल्लीला विजयासाठी अखेरच्या षटकात पुन्हा एकदा सहा धावांची गरज होती.

अखेरच्या षटकात लॉरा वोल्व्हार्ड स्ट्राईकवर होती. तिने पहिल्याच चेंडूवर चौकार लगावला, पण सोफी एकलस्टनने विजयासाठी दिल्लीला अखेरच्या चेंडूपर्यंत वाट पहायला लावली. लॉराने शेवटच्या चेंडूवर चौकार लगावत संघाला विजय मिळवून दिला.

तत्पूर्वी दिल्ली कॅपिटल्सने नाणेफेक जिंकत यूपी वॉरियर्स संघाला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले होते. युपीची सुरुवात फारशी चांगली झाली नाही. किरण नवगिरेला पहिल्याच षटकात मारिजन कापने बाद केले. यानंतर कर्णधार मेग लॅनिंगने ३८ चेंडूत नऊ चौकार व एका षटकारासह ५४ धावा केल्या, तर फिबी लिचफिल्ड २७ धावा करत बाद झाली. यानंतर हरलीन देओलने ३६ चेंडूत सात चौकारांसह ४७ धावांची खेळी करत रिटायर्ड आऊट झाली. मग सर्व फलंदाज झटपट बाद झाल्याने यूपीचा संघाच्या २० षटकांत ८ बाद १५४ धावा झाल्या होत्या.

# रणजी ट्रॉफी स्पर्धेत हैदराबादच्या कर्णधारपदी मोहम्मद सिराजची निवड

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

भारत आणि न्यूझीलंड या दोन्ही संघांमध्ये तीन वनडे सामन्यांची मालिका सुरू आहे. मालिकेतील पहिल्या सामन्यात भारतीय संघाने विजय मिळवला होता, तर मालिकेतील दुसऱ्या सामन्यात न्यूझीलंडने दमदार पुनरागमन करीत मालिका १-१ने बरोबरीत आणली. ही मालिका सुरू असताना मोहम्मद सिराजकडे मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

सध्या भारतात विजय हजारे ट्रॉफीतील सामने सुरू आहेत. ही स्पर्धा झाल्यानंतर रणजी ट्रॉफी २०२५-२६ स्पर्धेतील साखळी फेरीचे उर्वरित सामने खेळवले जाणार आहेत. क्रिकबझने दिलेल्या वृत्तानुसार रणजी ट्रॉफी स्पर्धेतील उर्वरित दोन सामन्यांसाठी हैदराबाद



क्रिकेट असोसिएशनने मोहम्मद सिराजची कर्णधार म्हणून निवड केली आहे. त्यामुळे भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील वनडे मालिका झाल्यानंतर सिराज मोठी जबाबदारी पार पाडताना दिसून येणार आहे.

याआधी झालेल्या सामन्यांमध्ये राहुल सिंगकडे हैदराबादच्या संघाची जबाबदारी सोपवण्यात आली होती, मात्र त्याच्या नेतृत्वाखाली खेळताना हैदराबादला अपेक्षित कामगिरी करता आलेली नाही. हैदराबादला पाचपैकी केवळ एका सामन्यात विजय मिळवता आला, तर तीन सामने ड्रॉ राहिले. त्यामुळे हैदराबाद क्रिकेट असोसिएशनने कर्णधार बदलण्याचा निर्णय घेतला आहे.

मोहम्मद सिराज पहिल्यांदाच हैदराबादचे नेतृत्व करताना दिसून येणार आहे. हैदराबादचा पुढील सामना २२ जानेवारीला मुंबईविरूद्ध, तर २९ जानेवारीला होणार सामना छत्तीसगडविरूद्ध होणार आहे. हा निर्णय अचानक घेण्यात आलेला नाही. सिराज हा हैदराबाद संघातील अनुभवी खेळाडू आहे. त्याच्याकडे ही जबाबदारी सोपवण्यापूर्वी हैदराबाद क्रिकेट असोसिएशनच्या निवडकर्त्यांनी त्याच्यासोबत चर्चा केली होती.

हैदराबादचा संघात आता मोहम्मद सिराज कर्णधार, तर राहुल सिंग उपकर्णधार असेल.




## उरण प्रीमियर लीगचा दिघोडे संघ मानकरी

**उरण : वार्ताहर**

२५ सप्टेंबर १९३०च्या जंगल सत्याग्रहातील आणि १९८४च्या गौरवशाली लढ्यातील हुतात्म्यांना अभिवादन राधेय सांस्कृतिक कला क्रीडा मंडळाच्या चिर्ले येथील मैदानावर उरण प्रीमियर लीगचे पाचवे पर्व रंगले.

या स्पर्धेत प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला तो दिघोडे येथील विनय ॲण्ड दृही इलेव्हन. द्वितीय क्रमांक ग्रीष्मा इंटरप्रायजेस मोठी जुई, तर तृतीय रियांश वॉरियर्स भेंडखळ या संघाने मिळविला. विनय इलेव्हन संघाचा योगेश कोळी याने सिक्सर किंगचा बहुमान मिळविला. विजेते संघ आणि चमकदार कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

## बीसीबीकडून 'त्या' वक्तव्याचा निषेध

**ढाका :** बांगलादेश क्रिकेट बोर्ड (बीसीबी) सध्या मोठ्या वादाच्या भोवऱ्यात अडकले आहे. बोर्डाचे संचालक एम. नजमुल इस्लाम यांनी माजी कर्णधार तमीम इक्बाल याला 'इंडियन एजंट' म्हटल्यामुळे देशात मोठा गदारोळ निर्माण झाला. या विधानानंतर खेळाडू व चाहत्यांमध्ये संतापाची लाट उसळल्याने अखेर बांगलादेश बोर्डाला बॅकफुटवर येत माफी मागावी लागली आहे.

भारत आणि बांगलादेश क्रिकेटमधील तणाव चर्चेद्वारे सोडवावा, असा सल्ला तमीम इक्बालने दिला होता. यानंतर इस्लाम यांनी तमीम 'इंडियन एजंट' असल्याची टीका केली होती. यामुळे वाढता विरोध पाहून बोर्डाने निवेदन जारी करीत म्हटले की, एखाद्या संचालकाचे वैयक्तिक विधान बोर्डाची भूमिका असू शकत नाही. बोर्ड अशा विधानांचा निषेध करते. शिस्तभंगविषयक कारवाईचा इशाराही बीसीबीने दिला आहे.

# 'किवीं'विरुद्ध केएल राहुलचा विक्रम

## शतक झळकवणारा पहिला भारतीय विकेटकिपर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील दुसऱ्या वनडे सामन्यात केएल राहुलने उत्कृष्ट शतकी खेळी करत संघाचा डाव सावरला. राहुलने पाचव्या क्रमांकावर फलंदाजी करत आपल्या कारकिर्दीतील आठवे वनडे शतक झळकावले. ९२ चेंडूंमध्ये ११२ धावांची नाबाद खेळी करताना त्याने १२ चौकार आणि एक षटकारासह आणि १२१.७४च्या स्ट्राईक रेटने कमालीची खेळी साकारली. यासह त्याने मोठा विक्रम आपल्या नावे केला आहे.

भारताची स्थिती ३ बाद ११५ धावा असताना राहुल फलंदाजीला उतरला. त्यानंतर काही वेळात विराट कोहली २३ धावांवर बाद झाल्याने दबाव आणखी वाढला, मात्र राहुलने संयम आणि आक्रमकतेचा उत्तम समतोल साधत जवळपास ३० षटके खेळपट्टीवर पाय घट्ट रोवून उभा होता आणि संघाला त्याने मजबूत स्थितीत आणले. राहुलच्या नाबाद खेळीसह भारताने २८५ धावांचा पल्ला गाठला.



वनडे क्रिकेटमध्ये फिनिशर म्हणून केएल राहुल दिवसेंदिवस अधिक प्रभावी कामगिरी करत आहे. या शतकासह त्याने आणखी एक विक्रम आपल्या नावावर केला. तो वनडे क्रिकेटमध्ये न्यूझीलंडविरुद्ध शतक झळकावणारा पहिला भारतीय विकेटकिपर ठरला. ही कामगिरी महेंद्रसिंह धोनीलाही करता आली नव्हती. याशिवाय, राजकोटमध्ये वनडे शतक करणारा तो पहिलाच भारतीय फलंदाज आहे.

२०२५पासून राहुलने वनडेमध्ये मधल्या फळीत फलंदाजी करताना वेगाने धावा केल्या आहेत. ४१ ते ५० षटकांदरम्यान त्याने २८३ धावा केल्या असून या टप्प्यात त्याचा स्ट्राइक रेट १४०.०९ इतका आहे. या फेजमध्ये सर्वाधिक धावा करणारा तो फलंदाज आहे, तर स्ट्राइक रेटच्या बाबतीत तो चौथ्या क्रमांकावर आहे.

केएल राहुलने पहिल्या वनडे सामन्यात छोटी पण महत्त्वपूर्ण खेळी केली होती. राहुलने २१ चेंडूत दोन चौकार व एका षटकारासह २९ धावा केल्या होत्या. त्याने या महत्त्वपूर्ण खेळीसह ४९व्या षटकात भारताला सहज विजय मिळवून दिला.

### प्रतिकूल परिस्थितीत शानदार खेळी

पाचव्या क्रमांकावर फलंदाजीस आलेल्या केएल राहुलने सुरुवातीला संयम दाखवत पहिल्या सहा चेंडूंवर धाव न काढता सावधपणे खेळला. सातव्या चेंडूवर त्याने खाते उघडले. दडपणाच्या परिस्थितीत राहुलने रवींद्र जडेजासह ७३ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी रचली. जडेजा २७ धावांवर बाद झाला. यानंतर राहुलने नितीश कुमार रेड्डीच्या साथीने भारताचा डाव सावरत पुढे नेला. त्याच्या शतकामुळे भारताने न्यूझीलंडसमोर विजयासाठी ७ बाद २८४ असे आव्हानात्मक लक्ष्य उभे केले.

**राज्य बॅडमिंटन स्पर्धा**

# नाशिक, मुंबई, नागपूर, कोल्हापूरची आगेकूच

**नाशिक : प्रतिनिधी**

जिल्हा बॅडमिंटन संघटनेच्या वतीने आणि महाराष्ट्र राज्य बॅडमिंटन संघटनेच्या मार्गदर्शनाखाली नाशिक येथे आयोजित ३५ वर्षे आणि त्यावरील विविध नऊ वयोगटाच्या महाराष्ट्र राज्यस्तरीय स्पर्धेत यजमान नाशिक, मुंबई, नागपूर, कोल्हापूर, पुणे, ठाणेच्या खेळाडूंनी उत्तम कामगिरी केली.

नाशिकचे चंदन जाधव, प्रणव सवाई-सुजय आघारकर, प्रशांत दुधेंडिया-सौरभ गाडगीळ, निश्म्रिता प्रभू-वर्षा थोरात यांनी उपांत्य फेरी गाठली. स्पर्धेत तिसऱ्या आणि चौथ्या दिवशी ३५ वर्षे, ४० वर्षे, ४५ वर्षे आणि ५० वर्षे या विविध गटांचे सामने खेळविले गेले. नाशिकच्या गंगापूर रोडजवळील केन्सिंगटन क्लब येथे ही स्पर्धा सुरू आहे.

पुरुषांच्या ४० वर्षे वयोगटामध्ये नाशिकचे दुसरे मानांकन असलेल्या चंदन जाधवने नागपूरच्या बाळकृष्ण भावे याचा २१-१६ आणि २१- १३ अशा सरळ दोन सेटमध्ये पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला. ३५ वर्षे गटाच्या दुहेरी प्रकारात नाशिकच्या प्रणव सवाई-सुजय आघारकर आणि मुंबईच्या सागर पाटील-सोमनाथ सोनावणे यांच्यातील उपउपांत्य लढत फारच चुरशीची झाली.

नाशिकच्या जोडीने एकमेकांमध्ये चांगला समन्वय राखत पहिल्या सेटमध्ये आघाडी घेत हा सेट २१-१३ असा जिंकून १-० अशी आघाडी घेतली. दुसऱ्या सेटमध्ये मात्र मुंबईच्या जोडीने संयमाने खेळ करत सेट २१-१६ असा जिंकून १-१ अशी बरोबरी साधली. तिसऱ्या निर्णायक सेटमध्ये १०-१० अशी बरोबरी होती. त्यानंतर मात्र नाशिकच्या प्रणव-सुजय जोडीने उत्कृष्ट खेळ करीत सेट २१-१७ असा जिंकून सामनाही जिंकत उपांत्य फेरीत आपले स्थान पक्के केले.

पुरुषांच्या ४० वर्षे गटात दुहेरी प्रकारात नाशिकच्या प्रशांत दुधेंडिया-सौरभ गाडगीळ आणि मुंबई उपनगरच्या मितेश अरोरा-विकास शेट्टी जोडीचा सामना २-२ अशा बरोबरीत असतांना मुंबईचा खेळाडू जखमी झाल्यामुळे या सामन्यात नाशिकच्या जोडीला उपांत्य फेरीसाठी चाल मिळाली.

पुरुषांच्या ३५ वर्षे गटात एकेरीमध्ये निनाद कामत (कोल्हापूर), ओंकार पालकर ( (सातारा), सोमनाथ सोनावणे आणि जसविंदर सिंग (दोघेही मुंबई शहर) यांनी उपांत्य फेरी गाठली. पुरुषांच्या ४० वर्षे गटात एकेरीत नाशिकचा चंदन जाधव, निगेल दास (ठाणे), निखिल कोल्हटकर (ठाणे), दीपक जैत (मुंबई) यांनी उपांत्य फेरीत प्रवेश केला. पुरुषांच्या ४५ वर्षे गटामध्ये एकेरीत जयेंद्र ढोले (नागपूर), विनीत (पुणे), कौशिक वर्तक (मुंबई), धीरेंद्र मौर्य (मुंबई) आणि विनित दाबक (पुणे) यांनी उपांत्य फेरी गाठली.

महिलांच्या ३५ वर्षे गटात एकेरी प्रकारात मुंबईच्या पल्लवी मित्तल आणि वरदा दीक्षित यांनी तसेच ४० वर्षे गटात मुंबईच्या पूजा झालाणी, फरहा त्रेहान, सौमी बोस आणि रम्या वेंकट यांनी उपांत्य फेरीत प्रवेश केला. ४५ वर्षे गटामध्ये मुंबईच्या सोनल भट्टड, प्रिया आंबेकर आणि पूजा श्रीराम यांनी आणि नागपूरच्या ज्योती वानखेडेने उपांत्य फेरीत प्रवेश केला.

# क्रिकेट स्पर्धेत नूतन चेहेर संघ विजेता



**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील चेहेर येथील क्रीडा संकुलात भाजप दक्षिण सरचिटणीस ॲड. महेश मोहिते आणि महिला मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष ॲड. मनस्वी मोहिते पुरस्कृत, नूतन चेहेर क्रीडा मंडळ आयोजित टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत यजमान संघ प्रथम क्रमांकाचा विजेता ठरला.

या स्पर्धेचे उद्घाटन मोहिते दाम्पत्याच्या हस्ते झाले. या स्पर्धेसाठी अध्यक्ष निलेश चवरकर, उपाध्यक्ष सुशील चवरकर, खजिनदार रसिक रोटकर, कर्णधार ऋषिकेश माळी आणि नूतन क्रीडा मंडळाचे परिश्रम लाभले. पंचाचे काम कल्पेश म्हात्रे, नितेश नरहरी यांनी, तर समालोचन किशोर कोकरे, दिलीप रोटकर, जगदीश चवरकर यांनी केले.

व्दितीय क्रमांक थेरोंडा, तर तृतीय क्रमांक शिरगाव संघाने प्राप्त केला. उत्कृष्ट फलदांज वेदांत (थेरोंडा), उत्कृष्ट गोलदांज (सार्थ), उत्कृष्ट क्षेत्ररक्षक जयेश (चेहेर), उत्कृष्ट झेल प्रिवेश (साळाव), सर्वाधिक विकेट जीत (चेहेर), मालिकावीर रक्षण भगत (थेरोंडा) यांची निवड करण्यात आली. विजेते संघ आणि वैयक्तिक उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्यांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

# मेग लॅनिंगने डब्ल्यूपीएलमध्ये पार केला एक हजार धावांचा टप्पा

**मुंबई : प्रतिनिधी**

महिला प्रीमियर लीग २०२६ स्पर्धेत एकापेक्षा एक रोमांचक सामने पहायला मिळत आहेत. या स्पर्धेतील सातवा सामना यूपी वॉरियर्स आणि दिल्ली कॅपिटल्स या दोन संघांमध्ये रंगला. यूपीकडून कर्णधार मेग लॅनिंग हिने मोठ्या विक्रमाला गवसणी घातली आहे.

या सामन्यात फलंदाजीला येण्यापूर्वी लॅनिंग डब्ल्यूपीएल स्पर्धेत एक हजार धावा करण्याच्या उंबरठ्यावर होती. या डावात फलंदाजीला आल्यानंतर चार धावा करताच हा टप्पा पूर्ण केला. यासह ती डब्ल्यूपीलच्या इतिहासात अशी कामगिरी करणारी तिसरीच फलंदाज ठरली आहे. याआधी मुंबई इंडियन्सच्या फलंदाज नेट



सिव्हर ब्रंट आणि हरमनप्रीत कौरने या स्पर्धेत एक हजार धावांचा पल्ला गाठला आहे.

सर्वात आधी एक हजार धावा पूर्ण करण्याचा विक्रम हा नेट सिव्हर ब्रंटच्या नावावर होता. त्यानंतर मुंबई इंडियन्सची कर्णधार हरमनप्रीत कौरने गुजरात जायंट्स संघाविरूद्ध फलंदाजी करताना हा पल्ला गाठला. तिने या सामन्यात ७१ धावांची निर्णायक खेळी करून मुंबई इंडियन्सला विजय मिळवून दिला होता.

मेग लॅनिंग या हंगामात पहिल्यांदाच यूपी वॉरियर्स संघाकडून खेळण्यासाठी मैदानात उतरली. याआधी झालेल्या तिन्ही हंगामात तिने दिल्ली कॅपिटल्स संघाचे नेतृत्व केले होते. यासह दिल्लीला फायनलमध्येही पोहचवले होते, पण ती दिल्लीला विजय मिळवून देऊ शकली नव्हती. या वेळी तिच्याकडे यूपी वॉरियर्सच्या नेतृत्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे, मात्र सुरुवातीच्या तिन्ही सामन्यांमध्ये यूपीला पराभवाचा सामना करावा लागला आहे.

## अमेरिकेविरुद्ध पटेलचा 'पंजा'

**बुलावायो : वृत्तसंस्था**

अंडर-१९ विश्वचषक स्पर्धेतील भारताचा पहिलाच सामना अमेरिका संघाविरूद्ध खेळवला गेला, ज्यात भारताच्या गोलंदाजांनी उत्कृष्ट गोलंदाजी करत अवघ्या १०७ धावांमध्ये अमेरिकेला सर्वबाद केले. यात भारताचा वेगवान गोलंदाज हेनिल पटेल याने पाच विकेट्स घेतल्या.

सामन्यात भारतीय कर्णधार आयुष म्हात्रेने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. युवा वेगवान गोलंदाज हेनिल पटेलने भारताचा निर्णय बरोबर असल्याचे सिद्ध करत अमेरिकेच्या टॉप ऑर्डरला माघारी धाडले. हेनिल पटेलने या सामन्यात सात षटकांमध्ये १६ धावा देत २.३० च्या इकॉनॉमीने पाच विकेट्स घेतल्या. यादरम्यान त्याने एक मेडन षटकही टाकले.

# दुसऱ्या वनडेत खराब क्षेत्ररक्षणाचा टीम इंडियाला फटका

**राजकोट : वृत्तसंस्था**

भारत आणि न्यूझीलंड या दोन्ही संघांमध्ये सुरू असलेल्या तीन वनडे सामन्यांच्या मालिकेतील दुसरा सामना राजकोटच्या सौराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या मैदानावर पार पडला. या सामन्यात खराब क्षेत्ररक्षणाचा भारतीय संघाला फटका बसला. भारतीय संघाने न्यूझीलंडसमोर विजयासाठी २८५ धावांचे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना भारतीय संघातील गोलंदाजांनी पूर्ण जोर लावला, पण क्षेत्ररक्षकांनी सोडलेल्या सोप्या झेलमुळे भारतीय संघाला हा सामना सात गडी राखून गमवावा लागला आहे.

भारतीय संघाने न्यूझीलंडसमोर विजयासाठी २८५ धावांचे आव्हान ठेवले होते. न्यूझीलंडकडून तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या विल यंगने ८७ धावांची खेळी केली. त्याचे शतक अवघ्या १३ धावांनी हुकले. त्यानंतर डॅरिल मिशेलने शतकी खेळी केली आणि ग्लेन फिलिप्सने त्याला चांगली साथ दिली. मिशेल आणि



यंगच्या भागीदारीमुळे हा सामना भारतीय संघाच्या हातून निसटला. शेवटी मिशेल १३१ धावांवर नाबाद राहिला.

डॅरिल मिचेलला सामन्यात दोन वेळी जीवदान मिळाले, तर अनेकदा मिसफिल्डमुळे चौकार व अनेक धावा गेल्या. याबाबत बोलताना भारताचा कर्णधार शुबमन गिल म्हणाला, फील्डिंगमधील चुका पाहता मागील सामन्यातही आम्ही काही संधी गमावल्या होत्या. आम्ही नेहमीच फील्डिंग सुधारण्याचा प्रयत्न करत असतो. हा असा एक घटक आहे, ज्यावर आम्ही सातत्याने काम करत आहोत

याआधी झालेल्या पहिल्या सामन्यात भारतीय संघाने एकतर्फी विजयाची नोंद केली होती. आता न्यूझीलंडने हा सामना जिंकून मालिका १-१ने बरोबरीत आणली आहे. मालिकेतील तिसरा सामना दोन्ही संघांसाठी निर्णायक ठरणार आहे. मालिकेतील तिसरा सामना १८ जानेवारीला इंदुरच्या अहिल्याबाई होळकर स्टेडियममध्ये खेळवला जाणार आहे.

> *मधल्या षटकांत आम्हाला विकेट्स मिळवता आल्या नाहीत. पाच फील्डर्स सर्कलमध्ये असताना, जर मधल्या षटकांत सातत्याने विकेट्स मिळाल्या नाहीत, तर परिस्थिती खूप कठीण होते. या टप्प्यात विकेट्स न मिळाल्यास कोणतेही टार्गेट रोखणे अवघड होऊन बसते. या फॉरमॅटमध्ये जर तुम्ही संधी सोडल्या, तर त्याची किंमत पराभवाच्या रूपाने मोजावी लागते.*
>
> **-शुबमन गिल,** भारतीय कर्णधार

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com